# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २०२ वा ❑ भारतीय सौर दिनांक ९ आश्विन शके १९४८, गुरूवार दि.०१ ऑक्टोंबर २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## डिजिटल चलन: डिजिटल युगातील एक गुप्त दरोडा

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य

डिजिटल चालान हा एक प्रकारचा गुप्त दरोडा असून अनेक वाहन चालकांनी या चालानावर नाराजी व्यक्त केली आहे.

वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी आणि रस्ते सुरक्षेसाठी तयार केलेली एक डिजिटल प्रणाली आहे. या चालान प्रकारात वाहनचालकाने केव्हा वाहतुकीचे नियम मोडले हे माहीत नसते.अनेक वाहन चालकांना डिजिटल चालान फाडल्याचे वेळेवर समजत नाही आणि नंतर अचानक मोठा दंड समोर येतो, ज्यामुळे लोकांमध्ये नाराजी आहे.

या समस्येचे मुख्य कारण म्हणजे ई-चालान थेट मोबाईलवर किंवा आरटीओ रेकॉर्डवर नोंदवले जाते, ज्यामुळे ती एक गुप्त कारवाई वाटते.

अनेकदा वाहन चालकांना आपण कधी आणि कुठे नियम मोडला हे माहितीच नसते आणि थेट मोबाईलवर दंडाचा मेसेज येतो, ज्यामुळे हा प्रकार गुप्त किंवा पारदर्शक नसलेला वाटू शकतो.

काहीवेळा तांत्रिक चुकीमुळे किंवा कॅमेऱ्याने नंबर प्लेट चुकीची स्कॅन केल्यामुळे दुसऱ्याच गाडीचे चालान आपल्याला येत असते.

आजकाल अनेक सायबर गुन्हेगार ट्रॅफिक पोलिसांच्या नावाखाली खोटे मेसेजेस ( किंवा ) पाठवत आहेत.आजकाल सायबर गुन्हेगार ट्रॅफिक पोलिसांच्या नावाखाली खोटे ई-चलान (-) मेसेजेस पाठवून लोकांची मोठी आर्थिक फसवणूक करत आहेत.

सायबर भामटे लोकांना चलान कापण्याचे मेसेज पाठवत आहेत आणि सापळ्यात अडकलेल्यांना लुटत आहेत.

सध्या सगळीकडे सायबर भामट्यांमी धुमाकूळ घातला आहे. त्यात सायबर भामटे रोज नवनव्या शक्कल लढवत असतात. त्यात आता अनेकांनी गाड्यांवर चलन कापून अनेकांकडून पैसे उकळल्याचे प्रकार समोर येत आहे. लोकांना चलान कापण्याचे मेसेज पाठवत आहेत आणि सापळ्यात अडकलेल्यांना लुटत आहेत. हा घोटाळा वाहनांच्या चालानाशी संबंधित असून, त्याबाबत पोलिसांनी अलर्टही जारी केला आहे.

बनावट ई-चलान स्कॅम हा एक नवीन प्रकारचा स्कॅम आहे. स्कॅमर्स लोकांना वाहतूक पोलिसांनी पाठवल्यासारखे मेसेज पाठवत आहेत. या मेसेजमध्ये तुम्ही ट्रॅफिक नियमांचे उल्लंघन केल्याचा दावा केला जात असून तुम्हाला दंड भरावा लागणार आहे. या मेसेजसोबत एक वेब लिंकही पाठवली जात आहे. लिंकवर क्लिक करून चलानाची रक्कम जमा करा, असे सांगितले जात आहे. या घोटाळ्याला समजून घेणे आणि त्यापासून सावध राहणे अत्यंत गरजेचे आहे.

नवीन वाहन कायद्यानुसार दंडाची रक्कम खूप जास्त वाढवली आहे. अनेकदा किरकोळ चुकीसाठीही (उदा. पांढरी रेषा ओलांडणे किंवा चुकून नो-पार्किंगमध्ये गाडी लावणे) हजारो रुपयांचा दंड होतो, जो सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारा नसतो.

अनेकदा चुकीच्या नंबर प्लेट स्कॅन झाल्यामुळे ज्या व्यक्तीने गुन्हा केलाच नाही, त्याला चलन जाते. दुसऱ्याच्या गाडीच्या चुकीचा दंड निष्पाप वाहनचालकाला भरावा लागतो.अनेकदा ई-चलन फाडल्याचा मेसेज मोबाईलवर येत नाही. जेव्हा वर्षभराने गाडी विकायला काढली जाते किंवा पोलीस पकडतात, तेव्हा हजारो रुपयांचे जुने दंड अचानक समोर येतात.

२६ सप्टेंबर २०२६ रोजी बेंगळुरूमधील वर्दळीच्या हेब्बल-टिन फॅक्टरी मार्गावर घडलेली घटना वरवर पाहता केवळ एका चुकीच्या चलनाची वाटत असली तरी, ती संपूर्ण स्वयंचलित पाळत ठेवणाऱ्या यंत्रणेच्या मर्यादा उघड्या करणारी आहे. सौविक दत्ता नावाचा एक तरुण आपल्या दुचाकीवरून एकटाच प्रवास करत होता. त्याच्या पाठीवर एक गिटार अडकवलेले होते. रस्त्यावरील अत्याधुनिक आणि कोट्यवधी रुपये खर्चून बसवलेल्या वाहतूक कॅमेऱ्याने त्याच्या पाठीवरील त्या गिटारला चक्क विनाहेल्मेट बसलेला सहप्रवासी गृहीत धरले.

रस्त्यांवर स्पष्ट फलक नसणे, पार्किंगची योग्य जागा नसणे किंवा पांढऱ्या रेषा पुसलेल्या असणे, अशा वेळीही कॅमेरे थेट फोटो काढून दंड वसूल करतात. यामुळे वाहनचालकांना ही यंत्रणा केवळ पैसे कमवण्याचे साधन वाटते.

आधी पोलीस जागेवर रोख पैसे घ्यायचे, ज्यामुळे लाचखोरी व्हायची. ई-चलन थेट सरकारी खात्यात जमा होत असल्यामुळे लाचखोरी बऱ्याच प्रमाणात कमी झाली असले तरी भ्रष्टाचार सुरुच आहे

ई चालान मुळे रस्ते सुरक्षेमध्ये सुधारणा झाली. कॅमेऱ्यांच्या भीतीने अनेक लोक आता वेगमर्यादा पाळतात आणि हेल्मेट/सीटबेल्ट वापरतात, ज्यामुळे अपघात कमी होण्यास मदत होत असल्याचे समोर येत असले तरी अपघाताचे प्रमाण कमी झाले नाही उलट वाढलेले आहे.

# भाषा हे विवादाचे नव्हे, तर सुसंवाद साधण्याचे माध्यम-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## 'सुशासन संवाद : मुंबई संकल्प'मध्ये मुख्यमंत्र्यांची पर्यावरण, जलव्यवस्थापन, कृषी आणि विकासाच्या विविध विषयांवर मुलाखत

ज्योतिर्मय 📖 साहित्य

मुंबई – भाषा हे विवादाचे माध्यम नसून सुसंवाद, समन्वय आणि समाजाला जोडण्याचे प्रभावी साधन आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. 'पाञ्चजन्य'च्या वतीने मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या 'सुशासन संवाद : मुंबई संकल्प' या कार्यक्रमात पाञ्चजन्यचे संपादक हितेश शंकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विशेष मुलाखत घेतली. यावेळी महाराष्ट्रासह देशातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरण, कृषी, रोजगार आणि विकासाशी संबंधित विविध विषयांवर मुख्यमंत्र्यांनी मनमोकळा संवाद साधला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले बदलत्या हवामानाचे परिणाम गेल्या काही वर्षांत अधिक प्रकर्षाने जाणवत आहेत. त्यामुळे पर्यावरण संवर्धन आणि प्रदूषण नियंत्रणासाठी राज्य शासनासोबतच समाजातील प्रत्येक घटकाने योगदान देणे आवश्यक आहे. ऊर्जा क्षेत्रात स्वच्छ आणि नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढविण्यावर शासनाचा भर आहे. सौरऊर्जेच्या माध्यमातून वीजनिर्मितीचा वाटा वाढविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. हवामान बदलाचे परिणाम आणि प्रदूषण रोखण्यासाठी राज्य शासनाने प्रभावी उपाययोजना केल्यास पर्यावरणाशी संबंधित अनेक समस्या दूर करता येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

जमिनीची उत्पादकता टिकविणे, जलस्रोतांचे संवर्धन करणे आणि जलप्रदूषण रोखणे ही आगामी काळातील महत्त्वाची आव्हाने आहेत. जलस्रोतांमध्ये प्रदूषित पाणी जाणार नाही, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्रातील पाण्याची उपलब्धता आणि भौगोलिक स्थिती यामध्ये असलेला असमतोल दूर करण्यासाठी दीर्घकालीन जलव्यवस्थापनावर भर देण्यात येत आहे. उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करून दुष्काळग्रस्त भागांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी विविध प्रकल्पांचे नियोजन करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

विदर्भातील वैनगंगा नदीचे समुद्राकडे वाहून जाणारे पाणी जलव्यवस्थापनाच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त भागांकडे वळविण्याच्या दृष्टीने वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे बुलडाणा तसेच विदर्भातील दुष्काळग्रस्त भागांना पाणी उपलब्ध होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पश्चिम घाटातून पश्चिमवाहिनी नद्यांद्वारे समुद्रात जाणाऱ्या पाण्याचा अधिक प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीनेही नियोजन करण्यात येत आहे. अतिरिक्त पाणी दुष्काळग्रस्त भागांकडे वळवून सिंचन आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. असेही त्यांनी सांगितले

महाराष्ट्रातील काही भागांना वारंवार पूरस्थितीचा सामना करावा लागतो, तर दुसऱ्या बाजूला अनेक भागांमध्ये पाण्याची टंचाई जाणवते. त्यामुळे अतिरिक्त पाण्याचे योग्य नियोजन करून त्याचा दुष्काळग्रस्त भागासाठी उपयोग करण्याची गरज आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

पूरस्थितीत उपलब्ध होणारे अतिरिक्त पाणी जलाशयांमध्ये वळविणे, नदीजोड प्रकल्प तसेच सिंचनाच्या माध्यमातून त्याचा उपयोग करणे यासाठी विविध उपाययोजनांवर काम सुरू आहे. या प्रकल्पांची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असून, दीर्घकालीन जलव्यवस्थापनातून महाराष्ट्रातील दुष्काळाची समस्या कमी करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळावी, यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून विविध उपाययोजना राबविण्यात येत असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नियमानुसार केंद्र शासनाकडे राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीअंतर्गत (एनडीआरएफ) मदतीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येतात. पात्र लाभार्थ्यांना मदत थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया राबविण्यात येते. शेतकऱ्यांना सिंचन सुविधा, बीज उपलब्धता आणि आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.




शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पारदर्शक आणि प्रभावी पद्धतीने पोहोचविण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात येत आहे. आधारआधारित पडताळणी, ई-केवायसी आणि थेट लाभ हस्तांतरणामुळे योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता वाढण्यास मदत होत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

लाभार्थ्यांची माहिती अद्ययावत ठेवणे आणि पात्र लाभार्थ्यांनाच योजनांचा लाभ मिळणे यासाठी आवश्यक पडताळणी प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सुशासन हे केवळ प्रशासनाच्या कार्यपद्धतीपुरते मर्यादित नसून नागरिकांना वेळेत, पारदर्शक आणि परिणामकारक सेवा उपलब्ध करून देणे हा त्याचा महत्वाचा भाग आहे. आधुनिक तंत्रज्ञान, सक्षम प्रशासन आणि दीर्घकालीन नियोजनाच्या माध्यमातून विकासाला गती देण्यावर शासनाचा भर असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एन. एच. (नाना)पालकर लिखित 'मॅन ऑफ दि मिलेनिया डॉ. हेडगेवार' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. 'सुशासन संवाद : मुंबई संकल्प' या कार्यक्रमाला अभिनेते व खासदार रवि किशन यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी हजेरी लावली. सुशासन संवाद कार्यक्रमात सुशासन, विकास, अर्थव्यवस्था, संस्कृती, आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक परिवर्तनाच्या विविध पैलूंवर विचारमंथन करण्यात आले.

# डॉ. नागेश अंकुश यांच्या 'मागोवा' ग्रंथाचा मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या संग्रहात समावेश

ज्योतिर्मय 📖 साहित्य

छत्रपती संभाजीनगर – राजहंस प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या डॉ. नागेश अंकुश लिखित 'मागोवा : मराठी प्रमाणलेखनाचा इतिहास' या ग्रंथाचा समावेश मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या समृद्ध आणि महत्त्वपूर्ण ग्रंथसंग्रहात करण्यात आला आहे. मराठी प्रमाणलेखनाच्या सुमारे चारशे वर्षांच्या वाटचालीचा अभ्यासपूर्ण मागोवा घेणाऱ्या या ग्रंथासाठी ही विशेष नोंद ठरते.

१८९८ मध्ये स्थापन झालेल्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या जतन व संवर्धनात दीर्घकाळ महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या ग्रंथसंग्रहालयात विविध विषयांवरील दुर्मीळ आणि मौल्यवान ग्रंथांचा समावेश असून, त्यातील अनेक ग्रंथ पुढील पिढ्यांसाठी दीर्घकालीन स्वरूपात (शंभर वर्षे) जतन केले जातात. अशा ज्ञानसंपदेच्या संदर्भ विभागात संग्रहात 'मागोवा'ला स्थान मिळाल्याने मराठी भाषा-अभ्यासासाठी हा ग्रंथ भविष्यात संशोधक, विद्यार्थी, शिक्षक, संपादक आणि भाषा-अभ्यासकांना उपलब्ध राहणार आहे. कार्याध्यक्ष मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय व संदर्भ विभागाच्या कार्यवाह, भाषा-अभ्यासक उमा नाबर यांनी 'मागोवा' या ग्रंथाची आवर्जून दखल घेत तो ग्रंथसंग्रहालयाच्या महत्त्वाच्या संग्रहात समाविष्ट करून घेतला आहे.

'मागोवा' या ग्रंथाला ज्येष्ठ व्याकरणकार व भाषा संशोधक प्रा. यास्मिन शेख यांची प्रस्तावना असून, ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांनी पाठराखण केली आहे. मराठी प्रमाणलेखनाची जडणघडण, त्यातील वेगवेगळ्या कालखंडांतील बदल आणि वर्तमान स्वरूप यांचा संशोधनात्मक अभ्यास या ग्रंथातून मांडण्यात आला आहे.

**'मागोवा' या ग्रंथाची वैशिष्ट्ये**

भाषेमध्ये प्रमाणलेखनाचे नेमके स्थान, प्रमाणलेखनाची जडणघडण




अधोरेखित करणाऱ्या विविध महत्त्वपूर्ण नोंदी, पाऊलखुणा, विविध शासकीय संस्थांचे यासंदर्भातले योगदान, प्रमाणलेखनाची तटस्थ, समतोल मांडणी, वेगवेगळी भूमिका असलेल्या विविध भाषा अभ्यासकांच्या भूमिकांची समग्र, एकात्म नोंद, भाषाभिवृद्धीसाठी विविध पूरक उपक्रम.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या मान्यवरांच्या वाचन-अभ्यासाशी संबंधित ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या या ग्रंथसंग्रहालयात आपल्या ग्रंथाला स्थान मिळणे-सन्मान होणे , ही आपल्या भाषा-अभ्यासाच्या प्रवासातली आनंददायी घटना असल्याची भावना लेखक डॉ. अंकुश यांनी व्यक्त केली.

# जेष्ठ नागरिक देशाचा अनमोल ठेवा आहेत

ज्योतिर्मय 📖 साहित्य

(जेष्ठ नागरिक दिन-०१ऑक्टोंबर,२०२६)

संपूर्ण देशात जवळपास १५ कोटी जेष्ठ नागरिक आहेत. जेष्ठ नागरिक कुटुंबाला मोठा आधार असतात. त्यांचे ज्ञान, त्यांचे अनुभव, त्यांचे कार्य हे केवळ कुटुंबालाच नाही तर संपूर्ण समाज व देशाला अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शनपर असते.जेष्ठ नागरिक म्हणजे कुटुंबाला ओझे नसून ते कुटुंबाचे खरे आधार स्तंभ आहेत. त्यांच्या पाठीशी असणारा अनुभव, त्यांनी केलेले कार्य, व म्हातारपणी सुद्धा पार पाडत असलेले कर्तव्य एक प्रकारची प्रेरणा होय.त्यांच्या अनुभवाचा लाभ फक्त कुटुंबालाच होतो असे नाही तर समाज, व देशाला ही मोठ्या प्रमाणात होतो. कुटुंबातील चढ-उतार, कुटुंबातील सुख-दुःख,



आडी-अडचणी यावर सुमार्ग काढण्याचे कार्य जेष्ठ अत्यंत सामंजस्यपणे

सहभागी होऊन कुटुंबाचे तारणहार बनतात. कुटुंबातील लहान मुलां-मुलींवर बोधक गोष्टी

कथा सांगून लहानग्यांना उद्बोधन करण्याचे कौशल्य त्यांच्याकडेच असते.सून व मुलात होणारे वाद, सासू व सुनेत होणारे वाद संयम व सामंजस्याने मिटविण्यासाठी जेष्ठ यांचा मोठा वाटा असतो. जेष्ठ नागरिक म्हणजे कुटुंबातील न्यायाधीश होत, जेष्ठ नागरिक म्हणजे कुटुंबाचे आधारस्तंभ होत, जेष्ठ नागरिक म्हणजे कुटुंबाची ऊर्जा व प्रेरणा होत. त्यांना त्यांच्या वृद्धापकाळात आधार देऊन कुटुंबात सन्मानाने वागवून त्यांची सेवा ही ईतर कोणत्याही सेवे पेक्षा सर्वश्रेष्ठ सेवा होय. अलीकडे जन्मदात्या आई-वडिलांना वृद्धाश्रमचा मार्ग दाखविणे हे प्रकार वाढत आहेत. आई-वडिलांना वृद्धाश्रमचा मार्ग दाखविणे मुलां-जीवनातील सर्वात मोठे पाप आहे. एकीकडे केंद्र व राज्य सरकार या जेष्ठ नागरिकांना विविध सोयी -सवलती देऊन त्यांना आधार व मोठा दिलासा देत आहे. केंद्र व राज्य सरकार या जेष्ठ नागरिकांना देशाचा अनमोल ठेवा मानत आहे.जेष्ठ नागरिक हे या देशाची ठेव मानत असतांना जेष्ठांची कुटुंबाकडून हेळसांड होणे हे अत्यंत दुर्दैव होय.

जेष्ठ नागरिकांनीही कालानुरूप व परिस्थितीनुरूप पाऊल टाकावे. आपल्या परिवारात मिळून – मिसळून रहावे. नेहमी सतर्क व सावधान रहावे, वृद्धापकाळात शारीरिक, मानसिक, बौद्धिक समस्या असतात मात्र यावर मात करून संयम व सामंजस्याची भूमिका स्वीकारावी. चीड चिडेपणा त्यागावा. मानांना चांगल्या कामात गुंतवावे,आरोग्य चांगले राहील या साठी सहज शक्य त्या शारीरिक हालचाली करीत राहाव्यात. वृद्धापकाळात स्मृतीभ्रंशाचा धोका असतो, म्हणून कृतिशील रहा, बोलके रहा, उलटे पाढे मोजा, कोडे सोडवा. मस्त रहा-स्वस्थ रहा व आयुष्याची संध्याकाळ आनंदात घालवा.




धोंडीरामसिंह ध. राजपूत
वैजापूर, छत्रपती संभाजीनगर
मो. ९४२१३१२२४४



# जात्यावरच्या ओव्या......

बैलपोळ्याचा सण
ओवाळ सुनबाई
दोन वृषभ दाराशी
घास पुरणाचा देई ||८६६||

बैलपोळ्याचा सण
वरणापुरणाचा थाट
पाडव्याच्या दिवशी
पाचपक्वानी ताट ||८६७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७६




ज्योतिर्मय साहित्य

पैठणच्या ब्रह्मवृंदासमोर ज्ञानदेवांनी सर्वांभूती एकच ईश्वर आहे हे रेड्याच्या मुखातून वेद वदवून सिद्ध केले. संत एकनाथांनी तृषार्त अशा गाढवाला गंगेचे पाणी पाजून त्याचा आत्मा शांत केला आणि सर्वांचा आत्मा एकच आहे याचा प्रत्यय लोकांना आणून दिला. भगवंताच्या भक्तीने या सगळ्या संतांच्या मनातील द्वंद्व नाहीसे झाले होते.

त्याप्रमाणे हरिनामाचे गुणगान केले की आपल्याही जाणिवा हळूहळू सूक्ष्म व्हायला लागतात. मनातील द्वंद्व नाहीसे होते. या जगामध्ये विविध रंग आणि रूपात तोच नटलेला आहे याचा साक्षात्कार होतो. जसे वेगवेगळ्या भांड्यात भरून ठेवलेले पाणी त्या भांड्याच्या आकारात राहते. पण पाणी एकच असते. सोन्याचे दागिने विविध प्रकारचे आणि आकाराचे असतात. पण त्यातील सोने एकच असते. त्याप्रमाणेच या विश्वात परमेश्वरच सगळीकडे भरून राहिला आहे ही जाणीव दृढ होत जाते. संत ज्ञानेश्वर म्हणतात, '' हे विश्वची माझे घर, ऐसी मती जयाची स्थिर, किंबहुना चराचर आपणचि जाहला.'' अशी साधकाची अवस्था होते. म्हणून आपण निर्वासन होऊन फक्त एका परमेश्वराचीच वासना धरावी असे समर्थांचे सांगणे आहे.



स्वसंवाद

१. माझी आजची भक्ती किंवा प्रार्थना ही देवाला काहीतरी मागण्यासाठी (सकाम) आहे, की मी केवळ त्याच्या स्वरूपासाठी (निष्काम) त्याची आराधना करतोय?

२. संतांनी गाढवात किंवा खांबातही देव पाहिला; मी माझ्या दैनंदिन जीवनात माझ्या आजूबाजूच्या माणसांमध्ये, प्राण्यांमध्ये तोच ईश्वरी अंश पाहू शकतो का?

३. माझ्या मनातील आपले-परके, चांगले-वाईट हे द्वंद्व किंवा भेद नष्ट व्हावेत म्हणून माझ्या ठायी रामनामाचा वृत्तीविश्वास दृढ झाला आहे का?

४. ज्ञानेश्वर माऊलींनी म्हटल्याप्रमाणे ''हे विश्वचि माझे घर'' ही भावना माझ्या मनात रुजण्यासाठी मी माझ्या संकुचित विचारांचा छेद (त्याग) करायला तयार आहे का?

(क्रमशः)




## ॥ संजय उवाच... ॥



@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ संयम

संयम हा गुण आयुष्यात खूप महत्वाचा आहे, प्रत्येक गोष्टीचा परिणाम ठराविक वेळात येतो तोपर्यंत आपल्याला संयम ठेवावा लागतो नाहीतर संयम नसेल तर काम फ़सू शकते. प्रत्येक यशस्वी माणूस संयम बाळगतो.

# नामाचे सूक्ष्म स्वरूप



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नुसते 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य 'नोकरी नोकरी' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. 'रामनाम' आणि 'नोकरी' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. 'राम राम' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वत:च्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा 'राम राम' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे 'नोकरी नोकरी' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. 'राम राम' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा 'नोकरी नोकरी' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच 'राम राम' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता' राम राम' जपावे.

मनाच्या सर्व दु:खाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच: प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. 'मी' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

***

# ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर, पुणे

## आपले सण आपले उत्सव

## पितृपक्ष

यावर भगवान म्हणाले की, जर उत्तम कर्म करून मृत व्यक्ती देवता झाली असेल तर, श्राद्धाचे अन्न त्याला अमृत म्हणून मिळते. तो गंधर्व योनीत असेल तर, त्यास भोग रूपाने ते अन्न मिळते. पशु योनीत जन्माला असेल तर, त्याला त्यांना तृण रूपात मिळते. नाग योनीत वायु रूपाने मिळते. पक्षांना फळांच्या रूपात मिळते. राक्षसांना मांस रूपाने मिळते. प्रेत योनीत रक्ताच्या रूपात आणि मनुष्य योनीत असेल तर त्यास ते अन्न म्हणून प्राप्त होते. गरुडाने विचारले की, या पृथ्वी लोकात मानवा द्वारे दिलेले हवन द्रव्य व श्राद्धात ब्राह्मणांना दिलेले अन्न पितृ लोकात कसे पोहोचते? ते अन्न कोण स्वीकारतो? मरण पावलेली माणसे त्याच्या मुलां द्वारे दिलेले पुण्य कर्माचे फळ कसे प्राप्त करून घेतो? भगवान म्हणाले, हे गरूडा, तुला श्रुतीचे प्रमाण देतो, श्राद्धात पितरांचे नाव व गोत्राचे उच्चारण केल्यावर, ते पितर त्या अन्नाला स्वीकारतात. भक्ती पूर्वक म्हटल्या जाणारे श्राद्धातील मंत्र त्यांना ते अन्न स्वीकारण्याचे बळ देतात. येथे अचेतन मंत्र ते अन्न कसे पोहोचवितात? असे तुला वाटत असेल तर सांगतो की, पितृ गणात अग्निश्वात पितृगण हे पितरांच्या राजे पदावर नियुक्त असतात. वेळ होताच विधिवत प्रतिपादित अन्न अभिष्ट पितृ पात्रात पोहोचल्या जाते. जिथे हा जीव राहतो.




## स्वच्छता अभियान व आपण.

मित्रांनो आणि वाचकहो मणुष्य हा समाजशील प्राणी आहे. समाजात राहूनच लोक, समाज, संस्था प्रशासन व स्थानिक महापालिकासारख्या यातूनआपण विकास करून जीवन जगतो. कोणत्याही छोट्या मोठ्या शहरात या कार्यरत आहेत. तेव्हा इथ मला हे सांगायचे आहे की आपणही त्यांना सहकार्य करणे आपले कर्तव्य आहे. भारतात राजकीय सत्ता ही विकेद्रित असून सर्वांना समान संधी मिळते. तसेच आपला देश धार्मिक शक्ती ईश्वर भक्ती आणि विविध सणांची रेलचेल असणारा देश आहे. ईश्वरभक्तीला आपण नि:स्वार्थ सेवा व स्वच्छता अभियानाला प्रोत्साहन देणे, त्यात घरापासून अंगण,गल्लीत मंदिरात, सार्वजनिक ठिकाणी प्रत्यक्ष सहभागी होऊन ईतरांना सांगितले पाहिजे.सामुहिक श्रमदान व स्वच्छता ही एक सवय बनवा म्हणजे आपले आरोग्यही बिघडणार नाही. मंदिरात दिवसभराचे ढीग साचतात, उघड्यावर कचरा वाकुल्या दाखवतो, युज अन्ड थ्रोचा अतिरेकी वापर रस्त्यावर तर आपण काय काय करतो याची दखल घेतच नाही, पाण्याची नासाडी, सणवारी, मिरवणूक, कार्यक्रम, कार्ये यात अन्न पाणी व ईतर नासाडी करून आपण काय दाखविते हे कोणीच मान्य करणार नाही!येथे समज देणे हा माझा हेतू नाही खर तर महिला काय पुरूष काय जिथे आपण खातो पितो जगतो राहतो, ऊठतो बसतो किंवा कामकाज करतो तेथील स्वच्छतेची जबाबदारी आपलीच असते! म्हणून मंदिर असो वा घरदार गल्लीत,रस्त्यावर ईतरत्र स्वच्छ-सुदंर ठेवूया कारण जेव्हा भक्ती आणि स्वच्छता यांच्या संगमाने खर्या अर्थाने पूजेचे सार्थक होईल .आज एवढे स्वच्छताधडे थांबून मीही थांबतो स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा सुप्रभात.



# ॥ श्री दत्त महिमा ॥



लेखन सेवा - योगीराज (नितीन) डोळे
आद्यपीठ वरद दत्त संस्थान
श्री क्षेत्र राक्षसभुवन ता.गेवराई जि. बीड

## आद्यपीठ श्री वरदत्त संस्थान आणि श्री नरसिंह सरस्वतीस्वामी महाराज

ज्योतिर्मय साहित्य

पंचमवेद अशी मान्यता असलेला संपूर्ण दत्त संप्रदायास वंदनीय असलेला ग्रंथ म्हणजे श्री गुरुचरित्र ग्रंथ या ग्रंथाचे नायक असलेले द्वितीय दत्त अवतारी पुरुष म्हणजे करंज नगरीतील नरसिंह सरस्वती स्वामी महाराज आणि वरद दत्त संस्थान यांचा संबंध असा की कथेतील अध्याय क्रमांक २, ४, १३, १४, , १५, ३७ आणि ५० या अध्यायामध्ये उल्लेख असल्याप्रमाणे बिदरच्या यवन राजाचे कष्ट निवारण केल्यानंतर त्याची भक्ती वाढली त्यांचे दर्शनाकरिता यवनांची गर्दी वाढली त्यामुळे अन्य भाविकांना त्रास होऊ लागला.

योगी जणांना या गोष्टीचा या उपाधीस व्याधी वाटू लागते. त्यामुळे अन्य भाविकांना अडचण होऊ नये म्हणून स्वामी महाराजांनी गौप्य रूपाने रहावे व तीर्थयात्रा करावी काही काळ गाणगापूर क्षेत्र त्याग करावे असा निर्णय घेतला. त्यावेळी त्यांनी आपले ''नरसो नरखांब'' असे नामाभिधान स्वीकारून गौतमितीरी अर्थात गोदावरी नदीकाठी भ्रमण केले असा उल्लेख आढळतो त्यावेळी सिंहस्त पर्व काळ सुरू असल्याने विशेष योगही होता

नाशिक सप्तशृंगी वगैरे दर्शन करून त्यांनी प्रवास सुरू केला त्याच वेळी वरद दत्त संस्थानचे तत्कालीन मठाधिपती सद्गुरु भाऊ स्वामी महाराज यांची भेट झाली उभयतांची चर्चा झाली मठाचे कार्य पुढे अखंडित सुरू राहावे याची चिंता त्यांनी स्वामी महाराजांकडे



व्यक्त केली त्यावेळी त्यांनी गडावरील तीन मुष्टीका मृत्तीका दिली. व

सपत्नीक ग्रहण करावे यामुळे पुढील मार्ग सुकर होईल अशी वाणी केली.

त्याचा परिणाम योग्य वेळी झाला त्यांचे सोबतच गौतमी

तटाक यात्रा करीत ते राक्षसभुवन क्षेत्री आले तेथील अन्नपूर्णा मठामध्ये तीन दिवस त्यांचे वास्तव्य होते. दत्त मंदिर परिसर गोदाकाठ येथील दत्त बागेमध्ये असलेल्या गुंफ मध्ये ते राहिले अशी पूर्वपार कथा दत्तलीला ग्रंथांमध्ये विदित आहे.

नंतरच्या काळात त्यांनी आंबा भवानी दर्शन अर्थात योगेश्वरी माता मंदिर तत्कालीन मोमीनाबाद आजचे अंबाजोगाई दर्शन करून वैजनाथाचे परळी ग्रामी दर्शन घेतले असा उल्लेख गुरुचरित्र ग्रंथांमध्ये आढळतो त्यानंतर त्यांनी परळी जवळील डोंगरतुकाई डोंगरा वर ❇आरोग्य भवानी❇ मंदिरात असलेल्या गुहेमध्ये वास्तव्य केले एक छोटीशी गुहा ज्यामध्ये जेमतेम एक व्यक्ती वास्तव्य करेल अशी आजही अस्तित्वात आहे अनेक वर्षे हे आरोग्य भवानी मंदिर भाविकांना अज्ञात होते मात्र पुढील काळात दत्तभक्तांनी संशोधन रुपी माहिती घेऊन ते स्थान प्रकाशात आणले आता भाविक संख्या वाढली आहे असे संदर्भ नरसो नरखांब नाम धारण करणे गौतमी तटाक यात्रा करणे सिंहस्थ पर्वातील गोदामातेचे दर्शन असा उल्लेख गुरुचरित्र ग्रंथांमध्ये आढळतो

प्रगट झाली महिमा ख्याती पहावया
येती म्लेंछ जाती आता राहावे आम्ही गुप्ती
लौकिकार्थ परियेसा ३२

आला ईश्वर नाम संवत्सरू सिंहास
याला असे गुरु गौतमी तीर्थे थोरू यात्प्रसंगी
जावे आता ३३

असा उल्लेख अध्याय क्रमांक ५० मध्ये आला आहे भाविकांना एका प्राचीन दत्त स्थानाची आणि नरसिंह सरस्वती स्वामी महाराज यांचा अन्योन्य संबंध ज्ञात व्हावा म्हणून दत्त महाराजांच्या इच्छेनुसार हा लेखन प्रपंच गुरुदेव दत्त कृपा करा.

# ॥ अभंग-माधव ॥



माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



-------- पितृपक्ष -------

माझे ते पितर । तिकडे स्वर्गात ।
असू दे सुखात । सदोदित ॥१॥
घालितो मी श्राद्ध । इकडे भूवर ।
सारेच पितर । राहो सुखी ॥२॥
नमितो मी सदा । पितृ परमेश ।
राहो माझा वंश । आनंदात ॥३॥
देतसे मी अर्घ्य । साऱ्या पितरांना ।
तयांना वेदना । कधी ना हो ॥४॥
ठेवा तुम्ही ध्यानी । आर्जवा ह्या माझ्या ।
मायबापा पूजा । ह्याच जन्मी ॥५॥
वाट नका पाहू । मायबाप ह्यांची ।
पितर होण्याची । आत्ता पूजा ॥६॥
ह्याच जन्मी करा । मायबापा सुखी ।
करितो विनंती । सकलांना ॥७॥
माधव हा म्हणे । ह्या पितृपक्षात ।
पितरा स्वर्गात । शांती मिळो ॥८॥

# निंदकाचे घर !



ज्योतिर्मय साहित्य

शोभा डे चे आत्मचरित्र ''सिलेक्टीव्ह मेमरी वाचत होते. एक मॉडेल, एक स्तंभलेखिका, कादंबरीकार तसेच संमजस आई व ''धार्मे च, अर्थेच, कामेच, नातिचरामि अशी अर्धांगिनी असलेल्या शोभा डे ने मला एक सकस, अनुभव समृद्ध जीवन दर्शन घडविले व एक व्यक्ती म्हणून मी स्वतःला तपासायला लागले ! मूल्यमापन करायला लागले, स्वतःचे स्वतः!!

माझ्या नवऱ्याने माझ्यावर एक टीका केली व म्हटले'' बघ, तुला रामदास स्वामी आवडतात ना, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ''निंदकाचे घर असावे शेजारी'', सारखा तुला मीच आहे! मी यावर त्यांना हसून म्हटले, ''रामदास स्वामींनी शेजारी म्हटले, पण घरातच निंदक आहे.

यातला विनोदाचा भाग सोडला तर आपले गुण दोष स्वभावातील उणिवा, वागण्यातील त्रुटी दाखविणे तसेच आपल्या स्वभावातले कंगोरे बोथट करणे हे जोडीदाराचे काम असते, नाही का ? कधी कधी तर आपल्याला माहित नसलेला स्वतः तला दोष त्याच्याकडून पॉईंट केला जातो. आणि वाटतं की खरेच की आपण जोडीदाराची तर गोष्टच सोडा व स्वतःचे स्वतःला तरी नीट ओळखतो का?




मला आर्किमिडीज म्हणतो त्याप्रमाणे'' मला पृथ्वी बाहेर उभी राहायला थोडी जागा द्या, मी पृथ्वीचे वजन करून दाखवितो तसे मला म्हणावेसे वाटते, थोडी स्वतः बाहेर निघू द्या मला, मीच स्वतःचे मूल्यमापन करू शकेल.! संसारात काही जोडीदार'' मेड फॉर इच ऑदर ''असतात तर बहुतांशी हे मेड बाय इच ऑदर '' असतात, नाही का?

# सेल्फी स्वतःकडे पाहण्याचा आरसा की जगाला दाखवण्याची सवय?

ज्योतिर्मय साहित्य

आजच्या मोबाईलच्या युगात ''सेल्फी'' हा शब्द आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. स्वतःचे आवरले की छानसा फोटो काढायचा. तो ग्रुप मध्ये पाठवायचा असेल तर पाठवायचा नाही तर स्वतः स्वतःच्या फोटोकडे पाहत बसायचं आणि मनातच एक छानस स्माईल द्यायचं आणि मनातल्या जुन्या आठवणी ताज्या करायच्या.

प्रवास असो, वाढदिवस असो, एखादा सण असो, मित्रांची भेट असो किंवा अगदी साधा आनंदाचा क्षण असो... लगेचच मोबाईल पर्स बाहेर येतो आणि लगेच आवाज येतो, ''चला, एक सेल्फी होऊन जाऊ द्या !''

सेल्फी म्हणजे केवळ स्वतःचा फोटो नव्हे; तो एखाद्या क्षणाची आठवण जपण्याचा सुंदर मार्गही आहे.

पूर्वी हे क्षण कॅमेऱ्यामध्ये टिपले जायचे, आणि फोटो धुवून मग तो फोटो पाहायला मिळायचा. जर फोटोचा रील सूर्यप्रकाशात उघडला गेला तर ते सगळे फोटो जायचे, म्हणजे ते क्षण कॅमेऱ्यात कैद होत होते पण प्रकाशझोतात आले तर ते क्षण गायब व्हायला वेळ लागायचा नाही. वर्षानुवर्षांनंतर एखादा जुना फोटो पाहिला की त्या दिवसाच्या आठवणी पुन्हा जाग्या होतात. त्या वेळी भेटलेली माणसं, केलेला प्रवास आणि अनुभवलेला आनंद मनात पुन्हा जिवंत होतो.



आपण कितीही वयोवृद्ध झालो तरी सुद्धा त्या आठवणीत रमायला सर्वांनाच आवडते.आज सेल्फीच्या दुनियेत एक वेगळीच स्पर्धा सुरू झाली आहे. फोटो काढण्यापेक्षा तो किती सुंदर दिसतो, किती लोकांनी लाईक केला, किती प्रतिक्रिया मिळाल्या, याला जास्त महत्त्व दिले जाते. चेहऱ्यावर फिल्टर लावून आपण जगाला सुंदर दिसण्याचा प्रयत्न करतो; पण कधी कधी स्वतः ला जसे आहे तसे स्वीकारणे विसरून जातो..

खरे तर प्रत्येक चेहरा वेगळा आहे, प्रत्येक व्यक्तीची ओळख वेगळी आहे आणि प्रत्येकाच्या हसण्यात एक खास सौंदर्य आहे. सेल्फीने आपल्याला कृत्रिम जगात अडकवले आहे असे नाही का वाटतं?? तो एक आपल्या आनंदाचा एक भाग असावा, पण त्यात कृत्रिमता अजिबात नको.

कधी कधी एखादा सुंदर सूर्योदय मोबाईलमध्ये कैद करण्यापेक्षा डोळ्यांनी अनुभवावा. मित्रांसोबतच्या गप्पा फोटोमध्ये टिपण्यापेक्षा मनात जपाव्यात. कारण काही क्षण कॅमेऱ्यात नाही, तर मनाच्या कोपऱ्यात जास्त सुंदर राहतात... म्हणूनच सेल्फी जरूर काढूया, आठवणीही जपूया; पण स्वतः ला विसरून नाही.




फोटो सुंदर दिसण्यापेक्षा जीवन सुंदर जगणे महत्त्वाचे आहे.तरीही काही गोष्टी विस्मृतीत जाण्यापेक्षा त्याचे स्मरण ठेवून फोटोग्राफी केली तर अतिशय उत्तम होते. पुन्हा पुन्हा तो क्षण अनुभवायला मिळतो. पण सारखेच फोटोग्राफी करण्यापेक्षा एक, दोन,तीन फोटो आणि मनाचा निखळ आनंद अनुभवावा.

एक सल्ला...

आजच्या पिढीसाठी --

तुम्ही सेल्फी काढण्याच्या नादामध्ये खूप खोल डोंगरदऱ्यांमध्ये,नदी नाल्यांमध्ये,समुद्रामध्ये उतरून आपल्या जीवाची हानी होणार नाही याकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावे ही आपल्या सर्वांना नम्र विनंती हे माझ्यासहित सर्वांना लागू होते...

उतार वयात हे नवे नवे हवे हवे असे वाटते
तेवढाच जीव त्या मधे रमेल असेच भासते....
सेल्फीमध्ये आपला चेहरा दिसतो
पण मनाच्या आरशात आपला खरा चेहरा दिसायला हवा हे मात्र निश्चित....

चला तर मनाच्या या भावनांच्या कोपऱ्यातून निसर्गाचा आनंद घेऊ या. सेल्फी तर काढूया पण जीवाचे हाल होणार नाही याकडे पण लक्ष देऊया...

***

# कृषिपुत्रांचा बाप्पा बांधिलकी मित्र मंडळाचा अनोखा गणेशोत्सव

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : शेतकरी आणि कृषी संस्कृतीशी असलेले नाते जपत सी. एस.एम.एस.एस कृषी महाविद्यालय कांचनवाडीतील बांधिलकी मित्र मंडळाने यंदाच्या गणेशोत्सवात ''अग्रीचा विघ्नहर्ता'' या रूपात श्री गणेशाची प्रतिष्ठापना केली होती. कृषी क्षेत्रातील कष्टकरी शेतकऱ्यांच्या जीवनाला आणि त्यांच्या योगदानाला अभिवादन करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

यंदा बांधिलकी मित्र मंडळाने अष्टविनायक ची प्रतिकृती साकारून सुंदर असा देखावा तयार केला होता.तसेच संपूर्ण दहा दिवस आरती, भजन, भारुड, अथर्वशीर्ष पठण, सामूहिक प्रार्थना इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले होते.



अग्रीच्या विघ्नहर्ता कडे शेतकऱ्यांच्या सुख-समृद्धीची, भरघोस पिकांची आणि निसर्गाच्या कृपेची व दुष्काळाचे सावट जाण्याची प्रार्थना करण्यात आली.तद्नंतर सामूहिक महाआरती करून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.पारंपरिक टाळ-मृदंगाच्या गजरात दिंडी काढून भक्तिमय वातावरणात गणरायाला निरोप देण्यात आला. टाळ-मृदंगाचा निनाद, दिंडीतील उत्साह आणि गणपती बाप्पाच्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला होता. ग्रामस्थ व महाविद्यालयातील प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे केले कौतुक. कृषी संस्कृती, भक्ती आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम घडवून बांधिलकी मित्र मंडळाने गणेशोत्सवाला आगळेवेगळे स्वरूप दिले.

''गणपती बाप्पा मोरया..!''
''ॲग्रीचा विघ्नहर्ता मोरया..!''




**सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....**



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'आई-मुलगी' (बिंब आणि प्रतिबिंब)

पुढे....

पण सतत सावलीत वाढणारे झाड कधीच उन्हापावसाच्या झळा सोसू शकत नाही; म्हणूनच ज्या मायलेकी या नात्यातील मर्यादा आणि ताकद ओळखतात, त्या संसारातल्या प्रत्येक वादळाला खंबीरपणे सामोरे जातात. आज या नात्याचा परिघ अधिक विस्तारण्याची गरज आहे. आईच्या मायेला पारख्या झालेल्या अनाथ लेकीला समाजाने आईचे प्रेम दिले पाहिजे, सासूने सुनेमध्ये आपली मुलगी पाहिली पाहिजे आणि सुनेनेही सासूच्या रूपात आईची सावली शोधली पाहिजे.

नात्यांच्या या भरजरी 'महावस्त्रा'चा हा 'आई-मुलगी' नावाचा पदर दोन घरांना पावित्र्याने जोडणारा, सासर-माहेर सांधणारा आणि वात्सल्याचा अखंड सुगंध देणारा पदर आहे. हा पदर जेवढ्या स्नेहाने जपला जाईल, तेवढे आपले कुटुंब अधिक आनंदी आणि सुसंस्कृत राहील!

© *विश्वास देशपांडे, चाळीसगाव.*



## ॥ श्री गणेश चिंतन ॥

*समर्थ रामदास स्वामी कृपेने मनाचे श्लोक व दासबोधाच्या आधाराने "गणेश उत्सवात १० दिवस नियमित एक गणेश चिंतन करू या कारण "जो स्वतः शुभ झाला तोच शुभारंभ करू शकतो"*

कृतज्ञ मी कृतार्थ मी, भगवंत हृदयस्थ आहे 🙏 अपर्णा परांजपे कात्रज पुणे

म्हणून समर्थांची ज्ञानयात्रा अशी पाहता येते—
शब्द → अर्थ → तत्त्व → बोध → परमार्थ
ही समर्थांनी या शब्दांत पाच पायऱ्यांची योजना केलेली नाही; हा त्यांच्या ओव्यांवरून काढलेला तात्त्विक धागा आहे.
३. "चत्वार वाचा" म्हणजे नेमके काय?
मनाच्या श्लोकात—"नमूं शारदा मूळ चत्वार वाचा"
आणि दासबोधात—
"सिद्धचि अंतरी संचली । चतुर्विधा प्रकारें ॥ १३॥"
त्यानंतर—
तींहीं वाचा अंतरीं आलें । तें वैखरिया प्रगट केलें ।
म्हणौन कर्तुत्व जितुकें जालें। तें शारदागुणें ॥ १४॥
इथे चतुर्विध वाणीची संकल्पना स्पष्टपणे येते.
परंपरेत त्या—परा → पश्यन्ती → मध्यमा → वैखरी
अशा सांगितल्या जातात.
याचा साधा अर्थ असा: परा :अव्यक्त, मूळ वाणी.
पश्यन्ती :अर्थाची पहिली अंत:स्फुरणा.
मध्यमा :मन-बुद्धीच्या स्तरावर आकार घेणारा शब्द/विचार.
वैखरी : जिभेने प्रत्यक्ष उच्चारलेला शब्द.
म्हणून आपण जे बोलतो तो शब्दाचा शेवटचा टप्पा आहे.
त्याआधी शब्द अंतर्मनात जन्म घेतो.
४. आणि इथे समर्थांचा अद्भुत विचार
समर्थ म्हणतात—
"जे उठवी शब्दांकुर । वदे वैखरी अपार ।
जे शब्दाचें अभ्यांतर । उकलून दावी ॥"
म्हणजे शारदा फक्त बोलण्याची शक्ती नाही.
ती शब्दाच्या अंतरंगातील अर्थ उलगडणारी शक्ती आहे.
यामुळे "सरस्वती म्हणजे बोलण्याची देवता" एवढे म्हणणे समर्थांच्या दृष्टीने अपुरे ठरेल.
वाणीचे बाह्य रूप – वैखरी.
वाणीचे अंतरंग – अर्थ.
अर्थाच्या अंतरंगात – ज्ञान.
५. पण इथे एक धक्कादायक ओवी आहे!
समर्थ पुढे म्हणतात—
जे योगियांची समाधी । जे धारिष्टांची कृतबुद्धी ।
जे विद्या अविद्या उपाधी । तोडून टाकी ॥ ३॥
हे अत्यंत गहन आहे.
शारदा म्हणजे विद्या—असे आपण सहज म्हणतो.
पण समर्थ म्हणतात—विद्या-अविद्येच्या उपाधीही तोडून टाकते.

## विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



### स्वप्न मोठं ठेवा, सुरुवात छोटी करा...

काही स्वप्नं डोळे उघडे असतानाही पाहिली जातात.
आईला स्वतःचं घर द्यायचं असतं...
वडिलांच्या कष्टांना विश्रांती द्यायची असते...
मुलांना चांगलं आयुष्य द्यायचं असतं...
किंवा परिस्थितीने आखलेल्या चौकटीबाहेर जाऊन स्वतःची ओळख निर्माण करायची असते.
पण स्वप्न मोठं असतं आणि हातात साधनं कमी असतात.
मग मन म्हणतं—
"माझ्याकडून हे कसं होणार?"
आणि याच एका प्रश्नामुळे कितीतरी स्वप्नं मनातच मरून जातात.
पण खरं तर स्वप्न पूर्ण करण्यासाठी सुरुवातीलाच सगळं मिळालेलं असण्याची गरज नसते.
फक्त पहिलं पाऊल टाकण्याची हिंमत लागते.
आपण सुरुवात करण्यासाठी मोठ्या संधीची वाट पाहतो; पण मोठ्या संधी अनेकदा छोट्या सुरुवातीमधूनच जन्म घेतात.
आपल्या स्वप्नांचा आकार आपल्या आजच्या परिस्थितीवर ठरू देऊ नका.
आज तुमच्याकडे मोठं भांडवल नसेल, तर ज्ञान मिळवा.
मोठी ओळख नसेल, तर प्रामाणिकपणे काम करा.
अनुभव नसेल, तर छोट्या संधी स्वीकारा.
वेळ कमी असेल, तर रोज थोडा वेळ स्वतःच्या स्वप्नासाठी राखून ठेवा.
सुरुवात छोटी असणं ही कमजोरी नाही. ती शिकण्याची, चुका सुधारण्याची आणि स्वतःला घडवण्याची संधी आहे.
मोठं स्वप्न पाहणं महत्त्वाचं आहे; पण त्या स्वप्नासाठी आज काय केलं, हा प्रश्न त्याहून महत्त्वाचा आहे.
कदाचित तुमचं पहिलं पाऊल कुणाला दिसणारही नाही. त्यावर टाळ्या वाजणार नाहीत. लगेच कौतुक मिळणार नाही.
तरीही ते पाऊल टाका.
कारण आजची छोटी बचत उद्याचं घर उभं करू शकते. आजचा एक तास उद्याचं कौशल्य घडवू शकतो. आजचा एक प्रामाणिक प्रयत्न उद्याच्या मोठ्या संधीचं दार उघडूशकतो.
आणि लक्षात ठेवा— (क्रमशः)

# कोल्हापूर येथे अ.भा. पूर्व सैनिक सेवा परिषदे“ च्या २७ व्या राष्ट्रीय वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन

## देशभरातील २८ राज्यातील व ८ केंद्रशासित प्रदेशातील सुमारे ३५० पूर्व सैनिक प्रतिनिधी सहभागी होणार

ज्योतिर्मय साहित्य

पुणे - माजी सैनिक कल्याण, राष्ट्रसेवा, समाजसेवा, संघटनात्मक विस्तार आणि आगामी काळातील विविध सामाजिक व पूर्व सैनिकांसाठी घेण्यात येणाऱ्या उपक्रमांवर व कल्याणकारी योजनांवर व्यापक विचारमंथन होणार आहे.

अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदे () ची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २ ते ४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत महाराष्ट्रातील पवित्र,आध्यात्मिक आणि सामाजिक कार्याच्या समृद्ध परंपरेसाठी प्रसिद्ध असलेल्या कोल्हापूर येथील ‘‘श्री क्षेत्र कणेरी मठ‘‘ येथे आयोजित करण्यात आली आहे.

या तीन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनासाठी देशाच्या विविध राज्यांतून सुमारे ३५० प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.यामध्ये विविध राज्य व जिल्हा पातळीवरील पदाधिकारी,माजी सैनिक, माजी सैनिकांच्या कुटुबियांचे प्रतिनिधी तसेच संस्थेच्या विविध उपक्रमांशी संबंधित कार्यकर्त्यांचा समावेश असेल. महाराष्ट्रातील विविध भागांतील आणि विशेषतः कोल्हापूर विभागातील माजी सैनिकांनाही या राष्ट्रीय सभेत सहभागी करून घेतले जाणार आहे.

माजी सैनिकांच्या संघटित शक्तीला राष्ट्रसेवेशी जोडण्याची प्रदीर्घ परंपरा

अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेच्या कार्यामागे माजी सैनिकांच्या अनुभव, शिस्त, नेतृत्वगुण, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रभक्तीचा उपयोग समाज व राष्ट्राच्या व्यापक हितासाठी करण्याची संकल्पना आहे.पूर्व सैनिकांसाठी राष्ट्रसेवा आणि सामाजिक बांधिलकीचे व्यासपीठ असावे,या विचारातून १९९२ मध्ये उत्तर प्रदेशात पूर्व सैनिक सेवा परिषद या संकल्पनेचा प्रारंभ झाला.या विचाराचा देशभर विस्तार होत गेला आणि नोव्हेंबर १९९५ मध्ये प्रथम अखिल भारतीय अधिवेशन आयोजित करण्यात आले.पुढे १४ सप्टेंबर १९९९ रोजी दिल्ली येथे अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषद या नावाने अखिल भारतीय संस्थेची औपचारिक नोंदणी करण्यात आली.

गेल्या तीन दशकांहून अधिक काळात परिषदने देशाच्या २८ राज्यात व ८ केंद्र शासित प्रदेशातील विविध भागांत आपले संघटनात्मक जाळे उभे केले असून, अनेक राज्ये व जिल्ह्यांमध्ये तिचे कार्य सुरू आहे. संस्थेचे राज्य व प्रांतीय घटक स्वतंत्रपणे कार्यरत असून ते राष्ट्रीय संस्थेशी संलग्न आहेत.

सेवानिवृत्तीनंतरही राष्ट्रसेवा संस्थेची मूलभूत भूमिका

परिषदेचा मूलभूत दृष्टिकोन असा आहे की,सैनिक वर्दीतून निवृत्त होतो,परंतु राष्ट्रसेवेच्या कार्यातून निवृत्त होत नाही.

भारतीय सशस्त्र दलांमध्ये दीर्घकाळ सेवा केल्यानंतर मिळालेले शिस्तबद्ध
जीवन,नेतृत्वक्षमता,व्यवस्थापनाचा अनुभव,संघभावना आणि राष्ट्रनिष्ठा या गुणांचा उपयोग

समाजाच्या विविध क्षेत्रांत करता यावा,हा परिषदेच्या कार्याचा केंद्रबिंदू आहे.

परिषदेच्या प्रमुख उद्दिष्टांमध्ये

माजी सैनिकांना राष्ट्रहिताच्या कार्यात संघटित करणे;

राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक समरसता आणि अंतर्गत सुरक्षेसाठी माजी सैनिकांच्या अनुभवाचा उपयोग करणे;

ग्रामीण व दुर्गम भागात शिक्षण,आरोग्य, स्वच्छता आणि सामाजिक विकासासाठी योगदान देणे;

माजी सैनिक,वीर नारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी कार्य करणे;

सेवानिवृत्तीनंतर माजी सैनिकांना सन्मानपूर्वक व स्वाभिमानाने पुनर्वसनासाठी सहकार्य करणे;

शहीद सैनिक आणि युद्धवीरांच्या स्मृती जतन करणे;

नव्या पिढीमध्ये राष्ट्रभक्ती, कर्तव्यभावना आणि राष्ट्रीय इतिहासाबद्दल जागरूकता निर्माण करणे

यांचा समावेश आहे.

सैनिक कुटुंबांच्या कल्याणासाठी कार्य

परिषदेने २००१ मध्ये सैनिक परिवार कल्याण न्यास ( ) स्थापन केला.युद्ध किंवा दहशतवादविरोधी कारवाईत प्राणार्पण केलेल्या सैनिकांच्या कुटुंबीयांसह गरजू माजी सैनिकांच्या कुटुंबांच्या कल्याणासाठी या माध्यमातून कार्य केले जाते.

माजी सैनिकांच्या मुलांना उच्च शिक्षण,व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणासाठी आर्थिक मदत करणे,शिष्यवृत्ती देणे,तसेच गरजू वीर नाऱ्यांना आर्थिक मदत करणे हे या कार्याचे महत्त्वाचे भाग आहेत.

युद्धवीर आणि शहीद कुटुंबांप्रती कृतज्ञता

परिषदेने विविध प्रसंगी युद्धात जखमी झालेल्या सैनिकांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना मदत केली आहे.१९९९ च्या कारगिल युद्धानंतर जखमी सैनिकांना रुग्णालयांमध्ये आवश्यक सहाय्य तसेच कारगिल शहीदांच्या कुटुंबांना आर्थिक मदत व सन्मानपत्र प्रदान करण्याचे राष्ट्रीय कार्यही करण्यात आले.२००२ मधील राष्ट्रीय सैन्य मोबिलायझेशनच्या काळात युद्धातील हुतात्मा सैनिकांचे पार्थिव त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचविण्याच्या कार्यातही परिषदेला जबाबदारी देण्यात आली होती.

राष्ट्रीय इतिहास आणि युवा पिढीशी जोडणारे उपक्रम

परिषदेच्या कार्यात राष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्याच्या आणि लष्करी इतिहासाच्या स्मृती जतन करण्यालाही महत्त्व आहे.




एप्रिल १९९७ मध्ये मणिपूरमधील मोइरांग येथून दिल्लीतील लाल किल्ल्यापर्यंत काढण्यात आलेली ध्वज यात्रा हा या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा ठरला.या यात्रेतून पुढे नेताजी-आझाद हिंद सेना स्मारक न्यास या उपक्रमाला प्रेरणा मिळाली.

अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषद आणि संबंधित संस्था दरवर्षी नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती,आझाद हिंद सेना दिवस तसेच अन्य राष्ट्रीय स्मृतिदिन विविध राज्यांमध्ये साजरे करतात.शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास,नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे योगदान आणि राष्ट्रासाठी केलेल्या बलिदानाची माहिती सर्वांपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमांचा उद्देश आहे.

वीर सैनिक ग्राम गौरव योजना

परिषदेच्या उल्लेखनीय उपक्रमांमध्ये वीर सैनिक ग्राम गौरव योजना याचाही समावेश आहे.युद्ध अथवा शांततेच्या काळात शौर्य गाजविणाऱ्या वीर सैनिक,शौर्यपदक विजेते आणि शहीदांच्या जन्मगावी त्यांच्या स्मृतीचा सन्मानकरण्याबरोबरच त्या गावाच्या सामाजिक विकासाला चालना देण्याचा या उपक्रमामागील विचार आहे.

२७ वी राष्ट्रीय सभा ही पुढील वाटचालीसाठी महत्त्वाचा टप्पा

२७ व्या व्या राष्ट्रीय सर्व साधारण सभे चे उदघाटन मेजर जनरल धनंजय जोशी ह्यांच्या हस्ते होणार आहे.ह्या वेळेस राष्ट्रीय अध्यक्ष ले जन. विष्णूकांत चतुर्वेदि, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय सह प्रचार प्रमुख आणि संस्थेचे मार्गदर्शक प्रदीप जोशी, महाराष्ट्र आणि गोवाचे अध्यक्ष एअर मार्शल प्रदीप बापट आणि इतर राष्ट्रीय आणि राज्याचे अधिकारी आणि सैनिक सदस्य उपस्थित असणार आहे.

कोल्हापूर येथे होणारी २७ वी राष्ट्रीय वार्षिक सर्वसाधारण सभा ही केवळ संघटनात्मक बैठक नसून,देशभरातील पूर्व सैनिकांना एका राष्ट्रीय व्यासपीठावर एकत्र आणणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

या सभेत मागील वर्षातील संस्थेच्या कार्याचा आढावा घेण्याबरोबर संघटनात्मक विस्तार व बळकटीकरण

माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांशी संबंधित विषय;

राज्य व जिल्हा स्तरावरील कार्याचा आढावा;

सामाजिक व राष्ट्रसेवेतील आगामी उपक्रम

युवा पिढीशी संवाद;

राष्ट्रीय इतिहास आणि सैनिकांच्या योगदानाविषयी जनजागृती

ग्रामीण व दुर्गम भागातील सेवा कार्य

आगामी वर्षातील कार्यक्रमांचे नियोजन

माजी सैनिकांच्या कॅन्टीन पेन्शन आणि  च्या समस्या ऐकण्या साठी आणि त्यांचे समाधान करण्या साठी दिल्ली हून अधिकृत सैन्य अधिकारी सेना मुख्यालया हून येणार आहेत.हे अधिकारी सैनिकां बरोबर संवाद साधणार आहेत.

पूर्व सैनिकांच्या विविध विषयांवर चर्चा व विचारमंथन केले जाणार आहे.

देशाच्या विविध भागांतून येणारे माजी सैनिक आणि महाराष्ट्रातील स्थानिक माजी सैनिक यांच्यातील संवाद, अनुभवांचीदेवाणघेवाण, परस्पर सहकार्य आणि संघटनात्मक समन्वय हा या राष्ट्रीय सभेचा आणखी एक महत्त्वाचा पैलू असेल.नमस्ते शौर्य फौंडेशन मुंबई तर्फे १९७१ च्या युद्धा चे दुर्मिळ छायाचित्र प्रदर्शनी भरविण्यात येणार आहे.३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सर्व प्रतिनिधींसाठी कलाकारांच्या तर्फे सदाबहार सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला आहे.

या राष्ट्रीय अधिवेशनासाठी कोल्हापुरातील श्री क्षेत्र कणेरी मठ यांची निवड ही विशेष महत्त्वाची आहे. अध्यात्मिक परंपरेबरोबरचसामाजिक, शैक्षणिक, ग्रामीण विकास आणि स्वावलंबनाशी संबंधित विविध उपक्रमांसाठी कणेरी मठाची ओळख आहे.म्हणूनच राष्ट्रसेवेची दीर्घ परंपरा असलेल्या माजी सैनिकांचे राष्ट्रीय अधिवेशन अशा सेवा आणि संस्काराच्या भूमीत होत असल्याने या आयोजनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

समारोप कार्यक्रम

तीन दिवसीय राष्ट्रीय सभेचा समारोप ४ ऑक्टोबर २०२६ रोजी होणार असून, राज्याचे मंत्री शंभूराज देसाई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.या प्रसंगी देशभरातून सहभागी होणाऱ्या माजी सैनिकांचा सन्मान, राष्ट्रीय सेवा आणि संघटनात्मक कार्याच्या पुढील दिशेवर विचार तसेच राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रसेवेचा संकल्प अधिक दृढ करण्यावर भर दिला जाणार आहे.

*महाराष्ट्राची भूमिका*

महाराष्ट्राच्या भूमीत होणारी ही राष्ट्रीय सभा राज्यातील माजी सैनिकांसाठीही महत्त्वाची संधी आहे. देशाच्या विविध भागांत कार्यरत असलेल्या माजी सैनिकांच्या संघटनांशी महाराष्ट्रातील माजी सैनिकांचा प्रत्यक्ष संवाद वाढविणे, विविध राज्यांतील कार्यपद्धतींची माहिती सर्वांना देणे व देवाणघेवाण करणे आणि भविष्यातील संयुक्त उपक्रमांना चालना देणे या दृष्टीने या सभेचे महत्त्व अधोरेखित होते.

‘‘राष्ट्र प्रथम सेवा, साहस आणि सन्मान‘‘ या भावनेतून कार्यरत असलेल्या पूर्व सैनिकांना एकत्र आणत,त्यांच्या अनुभव आणि सामर्थ्याचा उपयोग राष्ट्रनिर्माणासाठी करण्याच्या परिषदेच्या प्रयत्नांना २७ वी राष्ट्रीय सभा नवी दिशा देईल,अशी अपेक्षा आहे. ‘‘दिनांक २ ते ४ ऑक्टोबर २०२६ ह्या कालावधीमध्ये श्री क्षेत्र कणेरी मठ, कोल्हापूर, महाराष्ट्र येथे होणाऱ्या अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेच्या ह्या संमेलनामध्ये देशभरातील सुमारे ३५० राष्ट्रीय  प्रतिनिधी, महाराष्ट्र व गोवा राज्यासह माजी सैनिक उपस्थित राहणार असून या कार्यक्रमास ४ ऑक्टोबर २०२६ रोजीप्रमुख पाहुणे राज्याचे मंत्री शंभूराज देसाई असणार आहे‘‘ अशी माहिती अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेचे कोल्हापूर युनिटचे अध्यक्ष विलास सुळकुडे, अण्णासाहेब कुंभार, मुकुंद पिसे, दादासाहेब किल्लेदार यांनी एका पत्रकाद्वारे  दिली.

# कुटुंबप्रमुख हवा आहे ! (भाग १)

ज्योतिर्मय साहित्य

प्रख्यात डॉक्टर कृष्णकांत देसाई लॉस एंजेलिसमध्ये जाऊन आता जवळपास पंचवीस वर्षे झाली होती. इंजिनिअरिंगच्या पदव्युत्तर अभ्यासासाठी वडिलांनी हट्टाने त्यांना अमेरिकेत पाठवले होते. पुढे त्यांनी अवकाशशास्त्रातही पदव्युत्तर शिक्षण घेतले. त्याच काळात त्यांची ओळख पमेलाशी झाली. पमेला भारतीय, महाराष्ट्रीयन आणि उच्चशिक्षित होती. तिचे अमेरिकन वडील अमेरिकेच्या परराष्ट्र खात्यात अधिकारी होते आणि जवळपास पंधरा वर्षे भारतातील अमेरिकन दूतावासात दिल्लीमध्ये कार्यरत होते. पमेलाने पुरातत्त्वशास्त्रात पीएच. डी. केली होती आणि तिचे शिक्षण बनारस हिंदू विद्यापीठात झाले होते.

कृष्णकांतच्या आई-वडिलांना पमेला इतकी पसंत पडली की त्यांनी स्वतःहून तिच्या घरी जाऊन तिला सून म्हणून स्वीकारण्याची इच्छा व्यक्त केली. पुढे दोघांचा विवाह झाला. काळ पुढे सरकला. कृष्णकांत आणि पमेलाला दोन मुले झाली, बारा वर्षांचा श्रीराम आणि पाच वर्षांची श्रुतकीर्ती.




कृष्णकांत आणि पमेला दोघेही आठवड्यातील सहा दिवस अत्यंत व्यस्त असत. आपल्या मुलांवर भारतीय, विशेषतः हिंदू संस्कार व्हावेत, यावर दोघांचे पूर्ण एकमत होते. पण मुलांना वेळ देण्याइतका वेळच त्यांच्याकडे नव्हता. शेवटी त्यांनी एक वेगळा मार्ग शोधला. त्यांनी एका भारतीय वृत्तपत्रात जाहिरात दिली.

कुटुंबप्रमुख हवे आहे!

लॉस एंजेलिस येथे उच्चशिक्षित भारतीय कुटुंबास कुटुंबप्रमुखाची आवश्यकता आहे. व्यक्ती भारतीय, महाराष्ट्रीयन पुरुष असावा. वय ५० ते ८० वर्षे. गंभीर आजार नसावा आणि स्वतःचे सामान्य व्यवहार करण्यास समर्थ असावा. इंग्रजी, मराठी आणि संस्कृत या तीनही भाषा बोलता येणे आवश्यक. व्यक्ती मनमिळाऊ, प्रेमळ आणि संवादकुशल असावी. मुलांवर भारतीय हिंदू संस्कार घडविणे हा मुख्य उद्देश आहे.

संगणक व इतर विद्युत उपकरणे हाताळण्याचे ज्ञान असावे. वर्षातून एकदा भारतात येण्या-जाण्याचे विमानाचे तिकीट दिले जाईल. अमेरिकेत आजारी पडल्यास आवश्यक काळजी घेतली जाईल. वैयक्तिक खर्चासाठी दरमहा तीन हजार डॉलर दिले जातील. घरी गाडी व चालक तसेच स्वयंपाकी उपलब्ध असेल. मुलांची काळजी घेण्याकरीता दोन सहायक आहेत.

ही जाहिरात महाराष्ट्रातील एका मराठी वृत्तपत्रातही प्रसिद्ध करण्यात आली. पंधरा दिवस झाले; पण एकही प्रतिसाद आला नाही, आणि अचानक एके दिवशी कृष्णकांतच्या मोबाईलवर व्हॉट्सॲप संदेश आला.

‘‘तुमची मेल चेक करा.’’

कृष्णकांतने ताबडतोब ई-मेल उघडली. सुरुवातीलाच लिहिले होते,

‘‘मला तुमच्या सर्व अपेक्षा समजल्या आहेत. मी ते सर्व करू शकतो. मी यायला तयार आहे.

आपला कृपाभिलाषी,

माधव.’’

कृष्णकांत काही क्षण त्या नावाकडे पाहतच राहिला. मग त्याने पमेलाला हाक मारली,
‘‘अगं पमेला, इकडे ये जरा!’’

पमेला जवळ आली. कृष्णकांतने संगणकाचा पडदा तिच्यासमोर केला. पुढच्या क्षणी पमेलाच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. ती अविश्वासाने स्क्रीनकडे पाहत राहिली...

कारण ‘माधव’ हे नाव तिच्यासाठी अनोळखी नव्हते. ते नाव तिच्या अगदी जवळच्या नात्याशी जोडलेले होते, पण तिचा तो नातेवाईक हजारो मैल दूर असलेल्या लॉस एंजेलिसमधील या जाहिरातीला उत्तर देईल, याची तिला स्वप्नातही कल्पना नव्हती.

माधव नेमका कोण होता? आणि तो अमेरिकेत का येऊ इच्छित होता?

(क्रमशः  भाग २ : माधव कोण?)

# पुरुषाला कधीच न समजणारे बायकोशास्त्र

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

‘‘अगं, हे कुठे ठेवलं आहेस?’’

ती म्हणाली,

‘‘तिथेच आहे.’’

‘‘पण मला दिसत नाही,’’

‘‘तुम्हाला दिसणारच नाही. तुमच्या डोळ्यांसमोर असूनही तुम्ही शोधणार कुठे?’’

मी पुन्हा शोधले.

ती आली, दोन सेकंदात वस्तू काढली आणि म्हणाली,

‘‘हे इतकं समोर दिसत असताना तुम्हाला सापडत नाही.’’

मी मनात म्हटलं,

‘घरात वस्तू शोधण्यासाठी डोळे पुरेसे नसतात,बायकोची नजर लागते.’

टीव्हीचा रिमोट हा तर संसारातील अत्यंत संवेदनशील विषय बरं का.

रिमोट माझ्या हातात असला की मी बातम्या, क्रिकेट किंवा एखादा कार्यक्रम पाहतो.बायको म्हणते,

‘‘किती वेळ तेच बघणार?’’

मी रिमोट तिच्या हातात दिला की ती मालिका लावते.

मी विचारतो,

‘‘हे किती वेळ बघणार?’’

ती अगदी शांतपणे म्हणते,

‘‘आत्ता सुरूच झाली आहे’’

म्हणजे माझ्यासाठी कार्यक्रम काही महत्वाचा नाही आणि

तिच्यासाठी मालिका किती वेळ चालणार आहे याला बंधन नाही.

शेवटी रिमोटवरून वाद होऊ नये म्हणून मी एक नवीन नियम केला आहे,

रिमोट तिचा, टीव्ही तिचा,

आणि  रिचार्ज व लाईट बिल मात्र माझं.

बाजारहाटीचा आणखी एक किस्सा

बायको म्हणते,

‘‘बाजारात जाताना भाजी घेऊन या. थोडीच घ्या.’’मी विचारतो,

‘‘किती?थोडी.

आता ‘थोडी’ म्हणजे किती, याचे मोजमाप अजून मला सापडलेले नाही.



मी एक किलो घेऊन आलो तर म्हणते,

‘‘एवढी कशाला आणली?’’

आणि अर्धा किलो आणली तर

ही कशी पुरेल?

म्हणून आता बाजारात जाताना मी एकच नियम पाळतो,

बायकोने सांगितलेली भाजी घेऊन यायची,पण किती घ्यायची हे तिने सांगितले नाही तर

देवावर सोपवायचे!

‘काय झालं?’ हा प्रश्न धोकादायक असतो!

बायको शांत बसली असेल तर नवऱ्याने लगेच विचारू नये,

‘‘काय झालं?’’

कारण त्यानंतर ‘काय झालं’ याचे उत्तर सुरू झाले की ते कधी संपेल याची खात्री नसते.

आणि आपण जर म्हणालो,

‘‘काही नाही, सहज विचारलं.’’

तर उत्तर येते,

‘‘सहज कशाला विचारता? काहीतरी कारण असेलच ना?




म्हणजे प्रश्न विचारला तरी अडचण आणि नाही विचारला तरी अडचण.

त्यामुळे आता मी ‘काय झालं?’ हा प्रश्न शक्यतो टाळतो.

चेहऱ्यावरून अंदाज घेतो आणि शांत राहतो.

संसारात काही वेळा मौन हेच सर्वोत्तम उत्तर असते हे अनुभवातून आलेले शहाणपण.

बायको आणि नवऱ्याचे गणित

लग्नाच्या पहिल्या काही वर्षांत नवरा म्हणतो,

‘‘आपण दोघे मिळून सगळं करू.’’

दहा-पंधरा वर्षांनी म्हणतो,

‘‘आपण दोघांनी मिळून ठरवू.’’

आणि पंचवीस-तीस वर्षांनी?

नवरा म्हणतो,

‘‘तू ठरव... मी तुझ्या निर्णयाबरोबर आहे!’’

हीच संसाराची प्रगती असावी.

पस्तीस वर्षांचा संसार मागे वळून पाहताना वाटते,

किती छोट्या छोट्या गोष्टींवरून आपण हसलो, रुसलो, कधी भांडलो, कधी एकमेकांना समजावले आणि पुन्हा सगळं विसरून एकत्र चहा घेतला.

संसार म्हणजे कायम प्रेमाच्या कविता म्हणत राहणे नाही.

कधी मीठ सांडते,कधी चहा सांडतो,

कधी भाजी बदलते,

कधी रिमोटवरून वाद होतो, कधी शब्दांचा गैरसमज होतो, पण या सगळ्याच्या पलीकडे एक गोष्ट मात्र कायम असते

ती एकमेकांची साथ.

आणि म्हणूनच आजही मी विचार करतो,

बायकोशी नेमकं कसं वागावं?

गेल्या पस्तीस वर्षांत अजून तरी मला कळलेलं नाही!

पण एक गोष्ट मात्र नक्की कळली आहे,

बायकोला समजून घेण्याचा प्रयत्न करत राहणे, हा संसाराचा विषय आहे;

आणि तिला पूर्णपणे समजून घेणे, हा अजून संशोधनाचा विषय आहे.

कुणाला स्वतःची बायको कळाली असेल तर मला गुपचूप कळव बरं का.

टीप: लेखाला बायकोची परवानगी आहे. उगीच कुणी तिला व्हॉट्स करून भांडणे लावण्याचा प्रयत्न करू नये. आणि मी ही कारण मी मौन व्रत धारण केले आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# धनशेट्टी, शिंदे, सारडा, कुर्बान हुसेनी । कुर्बान कर दी जान हिंदुस्था पे अपनी ॥




ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

खालच्या न्यायालयाने या चौघांना फाशीची शिक्षा सुनावली.या निर्णयाविरुद्ध मल्लप्पा धनशेट्टी व इतरांनी वरच्या न्यायालयात अपील केले. उच्च न्यायालयानेही खालच्या न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला आणि मल्लप्पा धनशेट्टी व इतर तिघांच्या फाशीवर शिक्कामोर्तब केले. या निकालामुळे संपूर्ण सोलापूर शहरात तसेच मुंबई प्रांत व भारतभर तीव्र संताप व्यक्त झाला. मल्लप्पा धनशेट्टी व इतरांना वाचविण्यासाठी अनेक प्रयत्न झाले, याचिका दाखल करण्यात आल्या पण ब्रिटिश सरकारला मल्लप्पा धनशेट्टी व इतरांना फाशी देऊन संपूर्ण भारतभर दहशत निर्माण करायची असल्याने ब्रिटिश सरकारने आपला निर्णय बदलला नाही. मल्लप्पा रेवणसिद्धप्पा धनशेट्टी यांचा जन्म १८९८ साली झाला. त्यांचे वडील रेवणसिध्दप्पा धनशेट्टी सोलापूरातील पंदारकर घराण्याचे मुख्य मुनीम होते. मल्लप्पा हे उंचेपुरे व पिळदार बांध्याचे पैलवान होते. ते काँग्रेसच्या राष्ट्रीय सभेचे कार्यकर्ते आणि महात्मा गांधींच्या अहिंसा तत्वाचे अनुयायी होते. सोलापूर शहरातील सर्वसामान्य जनतेला राष्ट्रीय चळवळीशी जोडून घेण्याचे मोठे श्रेय मल्लप्पा धनशेट्टी यांना दिले जाते. त्यांनी सत्याग्रहाच्या तसेच दारूबंदीच्या चळवळीमध्ये सक्रीय नेतृत्व करीत कार्यकर्त्यांची मोठी फौज निर्माण केली होती. मल्लप्पा धनशेट्टी यांचा जनतेमध्ये मोठा आदरयुक्त दरारा होता. या नेतृत्वगुणांमुळे महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित होणारे मोर्चे, मिरवणुका आणि सभा शिस्तबद्ध रीतीने व शांततापूर्ण वातावरणात पार पडत असत.

महात्मा गांधीजींनी कायदेभंगाच्या चळवळी बाबतची योजना १९३० च्या सुरवातीला जाहीर केली. १२ मार्च १९३० रोजी साबरमती आश्रमातून पंचाहत्तर सहका-यांसमवेत निघून दांडी येथील समुद्रकिना-यापर्यंत जवळजवळ दोनशे मैल चालत जावयाचे आणि तेथे कायदा मोडून मीठ तयार करावयाचे अशी ही योजना होती. सत्याग्रहाचे हे अभिनव स्वरूप समजल्यावर सबंध भारत देश हेलावून गेला. दांडी-यात्रेला शुभ चिंतिण्यासाठी व निरोप देण्यासाठी अहमदाबादच्या परिसरातील पाऊण लाखाच्या आसपास लोक साबरमती आश्रमात जमले. जगातील वेगवेगळ्या देशांचे वार्ताहर मोठ्या कुतुहलाने दांडी-यात्रा पाहण्यासाठी भारतात येऊन दाखल झाले. ‘‘मीठ या शब्दाला अचानक एक वेगळेच सामर्थ्य प्राप्त झाले. मिठाभोवती एक गुढ तेजोवलय निर्माण झाले. मिठावरील करावर हल्ला करायचा, मिठाचा कायदा तोडायचा असे ठरले.’’ मिठाचा ठोक भाव त्याकाळी मणाला १० पै होता व ब्रिटिश सरकार त्यावर सव्वा रुपया कर लावत असे.

गांधीजी आणि त्यांचे पंचाहत्तर सहकारी यांचा हा जथा पदयात्रा करीत करीत साबरमती आश्रमातून दांडीच्या दिशेने कूच करू लागला. वाटेत प्रत्येक खेड्यातून लोकांनी या सत्याग्रही जथ्याचे अपूर्व उत्साहाने स्वागत केले. गांधीजी प्रत्येक खेड्यात छोटेसे भाषण करीत आणि या पदयात्रेव्दारे स्वातंत्र्याचा संदेश खेड्यापाड्यांपर्यंत पोचवीत होते. ही चळवळ अतिशय उदात्त होती. या जनआंदोलनाला गांधीजींनी एक नैतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले होते. दांडी - यात्रेमुळे अखिल भारतात जे नवचैतन्य निर्माण झाले त्यामुळे गांधीजींचे टीकाकार विस्मयचकीत होऊन, अवाक होऊन गेले. ठरल्याप्रमाणे ५ एप्रिलला गांधीजी व सहकारी दांडी येथे पोहोचले. ६ एप्रिल या तारखेस जालियनवाला बागेत ब्रिटिशांनी निरपराध भारतीयांची क्रूरपणे कत्तल केली होती. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्यचळवळीत या दिवसाला फार महत्व होते. म्हणून गांधीजी व त्यांच्या सहका-यांनी ६ एप्रिल १९३० रोजी दांडी येथील समुद्रकिना-यावर सत्याग्रह केला. देशभर हजारोंच्या संख्येने लोक ठिकठिकाणी गोळा झाले आणि त्यांनी मिठाचा कायदा तोडला. सोलापूर येथेही मल्लप्पा धनशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढून मिठाचा कायदा मोडण्यात आला. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना हे अनपेक्षित होते. त्यांच्या सत्तेला जोरदार हादरा बसला होता. या घटनेचे सार्थ वर्णन करताना गांधीजींना उद्देशून कविवर्य ग. दि. माडगूळकर यांनी लिहिले आहे... उचललेस तू मीठ मूठभर,

साम्राज्यांचा खचला पाया !.

स्वातंत्र्यसेनानी
शिरीष चिटणीस
सातारा, मो. 75888 65051



हा सत्याग्रह गावोगाव चालू झाला आणि ब्रिटिश शासनाने लाठीमार करीत सत्याग्रहींची धरपकड चालू केली. संपूर्ण देशभर या आंदोलनाने स्वातंत्र्यलढ्याची चळवळ फोफावली.

कायदेभंगाच्या १९३० च्या देशव्यापी चळवळीचे महत्व आणि तिचे परिणाम, यांविषयी लुई फिशर या वृत्तपत्रलेखकाने पुढील मार्मिक शब्दांत वर्णन केले आहे. लुई फिशर लिहितात, ‘‘गांधींनी १९३० मध्ये दोन गोष्टी करून दाखविल्या. पहिली म्हणजे, त्यांनी ब्रिटिशांना जाणीव करून दिली की, अमानुष जुलुमाच्या जोरावर त्यांनी भारताला पारतंत्र्यात जखडून ठेवले आहे. भारतीय लोक निर्भयपणे, स्वाभिमानाने व ताठ मानेने उभे ठाकले तर आपल्या खांद्यावरील साम्राज्याचे जोखड सहजपणे झुगारून देऊ शकतील, ह्याची ब्रिटिशांना व भारतीयांनाही गांधीनी जाणीव करून दिली. दंडूक्यांनी आणि बंदुकीच्या दस्त्यांनी हजारो भारतीयांना ब्रिटिशांनी मारझोड केली, परंतु सत्याग्रही डगमगले नाहीत, भिऊन पळाले नाहीत, कि, त्यांनी कसली तक्रार देखील न करता ते रेसभरही मागे हटले नाहीत. या भारतीयांच्या सुसंस्कृत कृतीमुळे इंग्लंडची पाशवी सत्ताच निष्प्रभ ठरली आणि भारतीय समाज अजिंक्य आहे हे प्रस्थापित केले.यावर हरिंद्रनाथ चटोपाध्यायांनीही तात्काळ कविता लिहिली होती. व ती अतिशय गाजली होती. ती अशी...

गुलाल से भर लो झोली, आज हमारी होली

हजार मत के, हजार पथ के। हे नववीरो नव भारत के

धन्य तुम्हे हे पुण्य पेशावर ।
धन्य तुम्हें शोलापूर रे भाई

सोलापूर येथे ८ मे १९३० रोजी मार्शल लॉ पुकारून हजारो सत्याग्रहींवर केलेल्या लाठीमार आणि गोळीबारामुळे जमाव हिंसक झाला, आणि या हिंसक जमावाने सोलापूर शहर ब्रिटिशांच्या तावडीतून ताब्यात घेतले. ९, १०, ११ मे भारतीयांची सत्ता सोलापूर शहरावर होती. ब्रिटिश लष्कर सोलापूरात पोहोचल्यावर पुन्हा ब्रिटिशांनी हा अमानुष अत्याचार करीत. सत्ता स्थापित केली. १२ जानेवारी १९३१ रोजी मल्लप्पा धनशेट्टी आणि त्यांच्या इतर साथीदारांना पुण्याच्या येरवडा जेलमध्ये फाशी देण्यात आली १९३० च्या कायदेभंग चळवळीतील ही अतिशय घृणास्पद घटना.

मल्लप्पा धनशेट्टी आणि त्यांच्या तीन साथीदारांचे बलिदान हे केवळ सोलापूर शहरापुरते मर्यादित न राहता संपूर्ण भारतीय स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणा देणारे ठरले. या चौघांनी हे सिद्ध करून दाखवले कि, स्वातंत्र्याची ज्योत ही केवळ मोठ्या शहरांमध्येच नव्हे तर छोट्या छोट्या शहरांतील सामान्य तरुणांच्या मनातही तितक्याच तीव्रतेने तेवत असते. त्यांच्या बलिदानाने हे देखील अधोरेखित केले की स्वातंत्र्यलढ्यात जात, धर्म, पंथ यांचा भेद नव्हता. हिंदू आणि मुस्लीम या चौघांनी एकत्र येऊन एकाच ध्येयासाठी आपले प्राण अर्पण केले. या घटनेनंतर सोलापूरला हुतात्म्यांचे शहर म्हणून ओळख प्राप्त झाली. सोलापूरकर १२ जानेवारी हा दिवस मोठ्या श्रध्दे ने आणि आदराने ‘‘हुतात्मा दिन‘‘ म्हणून साजरा करतात. या दिवशी शहरातील विविध संस्था, शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संघटना या चार हुतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात. शहरातील प्रमुख चौकात मल्लप्पा धनशेट्टी आणि इतर तिघांचे स्मारक उभारण्यात आले असून त्यांचे स्मारक आजही सोलापूरकरांना व भारतीयांना त्यांच्या बालिदानाची आठवण करून देते.

## जिल्हास्तरीय रायफल शूटिंगमध्ये स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाची चमकदार कामगिरी

### रोहिणी उमाळे, वंश सोनी प्रथम; वैष्णवी चौधरी, नकुल चव्हाण द्वितीय; उज्ज्वल गवळी प्रथम, सार्थक निकम तृतीय




ज्योतिर्मय साहित्य

जळगाव - शालेय जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत विविध गटांत पदकांची कमाई केली. या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

१९ वर्षांखालील मुलींच्या ओपन साइट एअर रायफल प्रकारात रोहिणी उमाळे हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर वैष्णवी चौधरी हिने द्वितीय क्रमांक मिळविला. १९ वर्षांखालील मुलांच्या ओपन साइट एअर रायफल प्रकारात वंश सोनी याने प्रथम क्रमांक, तर नकुल चव्हाण याने द्वितीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले.

तसेच पिस्तोल शूटिंग प्रकारात उज्ज्वल गवळी याने प्रथम क्रमांक मिळविला, तर सार्थक निकम याने तृतीय क्रमांक पटकावला. या सर्व खेळाडूंना क्रीडा शिक्षक डॉ. रणजीत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

खेळाडूंच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. डॉ. केतन नारखेडे (प्रभारी प्राचार्य, एम. जे. स्वायत्त महाविद्यालय), प्रा. आर. बी. ठाकरे (समन्वयक, के.सी.ई. सोसायटी कनिष्ठ महाविद्यालय), प्रा. स्वाती बऱ्हाटे (समन्वयक, के.सी.ई. सोसायटी कनिष्ठ महाविद्यालय), प्रा. राजश्री महाजन (उपप्राचार्य), प्रा. शिल्पा सरोदे (पर्यवेक्षिका), प्रा. उमेश पाटील (समन्वयक, कला व वाणिज्य शाखा), प्रा. गुणवंत वंजारी (समन्वयक, विज्ञान शाखा) आणि प्रा. वर्षा पाटील (चेअरमन, जिमखाना समिती) यांनी खेळाडूंचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## जागतिक ह्रदयदिनी डॉ. मृणाल देशपांडे यांचे ज्येष्ठ नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन




ज्योतिर्मय साहित्य

पुणे - मानसिक ताणतणावापासून मुक्ती , घरगुती सात्विक आहार , शरीराला झेपतील असा नियमित व्यायाम , शांत झोप आणि औषधांचे व्यवस्थापन योग्य प्रमाणात केले तर विशेषत्वाने मधुमेह, रक्तदाब सारखे अनेक आजार आपल्यापासून दूर राहतात असे प्रतिपादन डॉ. मृणाल मुळे - देशपांडे यांनी केले. जागतिक ह्रदय दिनानिमित्त पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्यावतीने आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या. मंगळवार दि. २९ रोजी कुणाल आयकॉन रोडवरील बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर सायंकाळी झालेल्या या कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला. व्याख्यानानंतर आपल्या आरोग्य विषयक समस्यांचे डॉ. मृणाल यांचेकडून मार्गदर्शनपर शंका निरसन करुन ज्येष्ठांनी योग्य ती माहिती जाणून घेतली.

प्रारंभी असोसिएशनच्या ज्येष्ठ नागरिक कलावंतांनी विविध गाणी सादर करुन उपस्थितांचे मनोरंजन केले. असोसिएशनच्या उपाध्यक्षा शकुंतला शिंदे, सचिव सखाराम ढाकणे आणि खजिनदार सुभाष पाटील यांच्याहस्ते डॉ. मृणाल देशपांडे यांचे शाल , स्मृतीचिन्ह आणि पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन भामिनी महाले यांनी केले. सुभाष विधाते यांच्या आभार प्रदर्शनानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विवेकानंद लिगाडे, अशोक कलाल, रमेश चांडगे, रमेश वाणी, अनिलकुमार शाह, दिलिप चौगुले, अशोक येळंमकर, रवींद्र संधानशिवे, शोभा राजगुरे, निर्मला कासार, पद्मा गवळी, विमल मोंढेकर यांनी परिश्रम घेतले.

## पितृपक्ष... मतांतरे

ज्योतिर्मय साहित्य

चैत्र महिन्यातील गुढीपाडव्यापासुन ते आतांच्या गौरी,गणपतीच्या उत्सवापर्यंत प्रत्येक महिन्यात आपल्याकडे सणवार, उत्सव यांची धामधूम सुरु असते. देवांबरोबरच निसर्गातील वनस्पती, प्राणीमात्रांचेही पूजन होते या काळात. आता मात्र नवरात्राची धामधूम सुरु होण्याच्या आधी थोडीशी उसंत असते. कारण मधल्या याकाळात पितृपंधरवडा असतो. गौरी गणपतीच्या काळात होणाऱ्या धावपळ, गडबड आणि जल्लोषाच्या, उत्साहाच्या वातावरणाच्या नंतरचा येणारा हा पंधरा दिवसांचा काळ म्हणजे खूपच शांत, थोडासा आरामदायक आळसावलेला, उदासीन भासतो.

आपण देवदेवतांचे, निसर्गाचे,प्राणीमात्रांचे जसे ऋणी असतो, तितकेच किंवा त्यापेक्षाही आपल्या पितरांचेसुद्धा ऋणी असतो, कारण त्यांच्यामुळेच आपण या जगात येतो. त्यांच्या आशीर्वाद, शुभेच्छा यामुळेच आयुष्यात यशस्वी होतो,त्यामुळे त्यांचे कायम स्मरण तरी असतेच,पण त्यांच्यासाठी खास काही कारणे शक्य होत नाही म्हणूनच वर्षातून एक दिवस तरी त्यांचेस्मरण करून त्यांना तृप्त करणे हे आपले कर्तव्यच आहे ना? अर्थात हे ज्याच्या त्याच्या श्रद्धेवर,मानण्यावर आहे.

लहानपणी आपण सारेच आजी-आजोबा, आई, बाबांकडून परी कथांसोबतच काही पौराणिक कथा, राक्षस, भूत, स्वर्ग, नरक, पाप, पुण्य वगैरे कथा ऐकतो.त्या साऱ्याच खऱ्या नसतात पण तेंव्हा

त्या खऱ्याच वाटतात. आता त्याची मजाही वाटते,पण काहीवेळा अशा काही अतर्क्य घटना घडतात कि त्यावेळी झटकन त्या डोळ्यांसमोर येतात आणि मग पाप .. पुण्य किंवा दैवीशक्ती, पूर्वजन्मीच्या पाप.. पुण्याची फळे वगैरे खरंच असेल का अशी शंका सुद्धा मनात येतेच. याबद्दल आस्तिक,नास्तिक यांच्यात बरेचसे मतभेद आहेत म्हणुन आता यासाऱ्या गोष्टींचा विचार बाजूला ठेवून वास्तव दृष्टीने आपण या संबंधी विचार करूया.

काही लोकांचा श्राद्ध,पक्ष किंवा पिंडदान यावर विश्वास नाही. त्यांच्यामते हे सारे काल्पनिक असून त्याचा ब्राह्मणलोक गैरफायदा घेतात, फसवतात.. त्यांच्या दृष्टीने ते खरेही असले तरी दुसऱ्या बाजूने विचार केला तरी एखादेवेळी वाटेत आपली गाडी अचानक पंक्चर होते तेंव्हा

थोड्या अंतरावरच आपल्याला पंक्चर काढण्याचे दुकान दिसते. त्याचवेळी कदाचित त्यानेच धंद्यासाठी म्हणून वाटेत टाकलेल्या खिळ्यामुळे गाडी पंक्चर झाल्याचे लक्षात आले तरीही आपण त्याच्याकडे जाऊन ते काढून घेतोच ना? किंवा दुखणे आल्यावर डॉक्टर, चप्पल तुटली तर चर्मकार, किंवा एखादा खटला असेल तर वकिलाकडे जातोच ना? मग

एखाद्याला जर मनःशांती मिळत असेल तर त्याने ब्राह्मणाकडून जर हे केले तर त्यात चुकीचे किंवा वाईट काय आहे?त्यातूनसुद्धा जरी हे चुकीचे वाटले तरी एरव्ही आपण दानधर्म करतोच ना,त्यावेळी आपण गरजू किंवा गरीबाला ते देतो त्यावेळी त्याची जात, धर्म वगैरे नाही ना पहात? मग यात तर आपण एखाद्या त्याच्या धर्माचे पालन करणाऱ्या, आपल्यालाही मनः शांती मिळवून देणाऱ्या गरजू व्यक्तीला जर काही दिले तर ते चूक आहे का?

पितृपक्ष सुरु झाला की सर्वत्र त्यावर असंख्य लेख,कथा,कविता,व्यंगचित्रे अशा अनेक गोष्टी अनेक माध्यमातून चर्चेत येतात. आता मोबाईल

मधून तरी व्हाट्सअप, फेसबुक वगैरे मधून तरी अक्षरशः भडीमार सुरु होतो. तो संपेपर्यंत ऊत येतो.पितरांचे ऋण, काकस्पर्श, पिंडदान, त्यांना अन्न..पाणी देण्यासंबंधी केल्या जाणाऱ्या विधींवर चांगल्या,वाईट,थट्टा, चर्चा होतात. वडिलधाऱ्या लोकांना ते जिवंत असताना



सौ. स्नेहा मुसरीफ,
पुणे

छळणारे लोकसुद्धा याचा अगदी चवीने आस्वाद घेतात. ते गेल्यानंतर कदाचित याचीच जाणीव होऊन ते आपल्याला त्रास देतील या भीतीपोटी श्राद्ध, पक्षही करतात. पण कोणतेच आई,वडील आपल्या मुलांना जिवंतपणी सोडाच पण नंतरही त्रास देणे शक्यच नाही. मग त्यांची किमान या तिथीला तरी आठवण म्हणुन हा विधी केला तर त्यात गैर काहीच नाही ना!

बरे,आई,वडिलांची गोष्ट सोडली .. तरी या सर्व

पितरांमध्ये कदाचित कोणी दुखावला गेलेला किंवा मुळातच वाईट असा कोणी खाष्ट काका वगैरे असेल तर हा विधी खरंच त्यांना जर अन्न, पाणी देत असेल असे मानले तर त्यामुळे तो शांत,तृप्तच होईल ना? आणि हे खोटे मानले तरी आपल्या मनाला याचे समाधान तरी मिळेल ना ,शेवटी भावनेलाही याचा आधार वाटेलच. शिवाय आपल्याला हे समाधान दिले त्या योग्य व्यक्तीला, ब्राह्मणाला आपण दक्षिणा दिली हे समाधान सुद्धा मिळेल.कारण कोणतेही दान हे सत्पात्री करावे असे म्हणतात.

आमच्या समोर राहणारे जोशीकाका अचानक एका ऍक्सीडेन्टमध्ये गेले. त्यांचा मुलगा समीर हा सायंटिस्ट! अर्थातच खूपच प्रॅक्टिकल आणि फक्त स्वतःच्या कर्तुत्ववावर आणि कर्मावर विश्वास असलेला. पाहता पाहता काकांचे वर्षश्राद्ध आले. काकूंना खूपच टेन्शन होते, कसे करावे? आयुष्याचा जोडीदार अचानक सोडून गेल्याचे दुःख तर मोठे होतेच पण त्या खूप धार्मिक असल्यामुळे समीरने वर्षश्राद्ध व्यवस्थित करावे असे मनातून खूप वाटत होते पण सांगावे कसे?

नाही म्हणाला,त्यापेक्षा एखाद्या संस्थेला देणगी देतो म्हणाला तर काय करणार? त्यापेक्षा न बोललेलेच बरे ,असे म्हणून मनात ठेवून गप्प होत्या. त्यांच्या मनाची तगमग समीरने लगेंच ओळखली आणि त्यादिवशी अगदी व्यवस्थित यथासांग श्राद्ध केले. खरेतर हे त्याच्या तत्वात बसत नव्हते पण केवळ आईसाठी ,तिला समाधान वाटावे म्हणून त्याने ते केले. आणि ते करताना काकुना त्याच्याबद्दल जो अभिमान, आधार,आनंद मिळाला होता तो त्यांच्या नजरेतून अगदी ओसंडून वाहत होता. प्रॅक्टिकल असलेल्या समीरने सुद्धा हाच विचार केला होता की वडिलांना जेवण, पाणी दिले ते त्यांना खरंच मिळाले की नाही हे जरी ठाऊक नसले तरी आज जिवंत असलेल्या आईला आनंद, समाधान देऊ शकलो, याचा आनंद खरोखरच लाखमोलाचा आहे.

तसे पाश्चात्त्य संस्कृतीचे अनुकरण करताना आपण फादर्स डे,मदर्स डे,व्हॅलेंटोईन डे,रोज डे

असे कितीतरी दिवस खास साजरे करतो. तसा एक खास दिवस आपल्याला घडवलेल्या पितरा

साठी, एक विधी म्हणून केला तर काय हरकत आहे?

विज्ञान कितीही पुढे गेलेले असले ,अगदी माणूस चंद्रावर,मंगळावर गेलेला असला तरीही एक अज्ञात शक्ती आहेच,तिचे अस्तित्व कोणीच नाकारू शकत नाही. कारण तसे असते तर जन्म,मृत्यू यावर आपणाला विजय मिळवता आला असता. तो अधिकार फक्त त्या शक्तीकडेच आहे. म्हणूनच अज्ञात,अतर्क्य गोष्टींवर थोडासा विश्वास ठेवून स्वतःला आणि इतरांनाही मानसिक समाधान मिळवण्यासाठी का होईना हे पितरांची आठवण म्हणुन किंवा कर्तव्य,जबाबदारी समजून तरी हा पितर डे विधिपूर्वक आवर्जून करावा आणि पुढच्या पिढीलाही आपल्या भारतीय संस्कृतीचा हा वारसा त्याचे महत्व, सांगून सुपूर्त करावा हाच आपल्या संस्कृतीचा विजय असेल.

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# माजी अग्निवीरांसाठी महाराष्ट्र शासनाच्या शासकीय सेवेत १०% समांतर आरक्षणाच्या निर्णयाचे अ.भा. पूर्व सैनिक सेवा परिषदेकडून स्वागत

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – महाराष्ट्र शासनाने राज्यातील माजी अग्निवीरांना शासकीय तसेच निमशासकीय सेवांमध्ये १०% समांतर आरक्षण देण्याचा घेतलेला महत्त्वपूर्ण निर्णय हा अग्निवीरांच्या भविष्यासाठी तसेच त्यांच्या लष्करी प्रशिक्षणाचा शासनाच्या सेवेत प्रभावी उपयोग करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषद (), महाराष्ट्र व गोवा राज्य शाखेने या निर्णयाचे मनःपूर्वक स्वागत केले आहे.

महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या २९ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. उपलब्ध माहितीनुसार, माजी अग्निवीरांसाठी राज्यातील गट–क गणवेशधारी सेवांमध्ये १०% समांतर आरक्षण देण्याचे धोरण मंजूर करण्यात आले आहे.या धोरणाचा लाभ महाराष्ट्रातील रहिवासी असलेल्या माजी अग्निवीरांना मिळणार असून पोलीस,राज्य राखीव पोलीस दल,कारागृह,अग्निशमन, वन, राज्य उत्पादन शुल्क तसेच इतर संबंधित गणवेशधारी सेवांचा त्यात समावेश करण्यात आला आहे.

**अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश**

अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषद, महाराष्ट्र व गोवा यांनी अग्निवीरांच्या भवितव्याचा प्रश्न सुरुवातीपासूनच गांभीर्याने घेतला होता.जून २०२५ मध्ये ने महाराष्ट्राचे माजी सैनिक कल्याण मंत्री शंभुराज देसाई यांच्याकडे निवेदन सादर करून, चार वर्षांची सेवा पूर्ण करून बाहेर पडणाऱ्या अग्निवीरांना महाराष्ट्र शासनाच्या सेवेत योग्य संधी व आरक्षण देण्याची मागणी केली होती.

विशेषतः डिसेंबर २०२६ पासून पहिल्या तुकडीतील अग्निवीर चार वर्षांची सेवा पूर्ण करून बाहेर पडणार असल्याने, त्यांच्यासाठी वेळेत रोजगाराची व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे ने शासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. च्या या मागणीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने माजी अग्निवीरांना विविध शासकीय व निमशासकीय सेवांमध्ये सामावून घेण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती. या समितीमध्ये एअर व्हाइस मार्शल नितीन वैद्य, (निवृत्त),उपाध्यक्ष, अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषद, महाराष्ट्र व गोवा यांचाही समावेश होता. चे प्रतिनिधित्व करताना त्यांनी अग्निवीरांच्या लष्करी प्रशिक्षणाचा, कौशल्यांचा आणि अनुभवाचा शासनाच्या विविध सेवांमध्ये प्रभावी उपयोग कसा करता येईल याबाबत महत्त्वपूर्ण योगदान दिले.

१०% आरक्षणासोबत विविध सवलती मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार माजी अग्निवीरांसाठी १०% समांतर आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.उपलब्ध माहितीनुसार,भरती प्रक्रियेत त्यांना वयोमर्यादेत शिथिलता, लेखी परीक्षेतून सवलत तसेच शारीरिक पात्रता निकषांमध्ये आवश्यक सवलती देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यांनी लष्करी सेवेदरम्यान घेतलेले प्रशिक्षण पुन्हा देण्याची आवश्यकता नसावी, या भूमिकेलाही धोरणात स्थान देण्यात आले आहे; मात्र विशिष्ट पदासाठी आवश्यक असलेले पदविशिष्ट प्रशिक्षण लागू राहू शकते. या निर्णयामुळे भारतीय सशस्त्र दलात चार वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या तरुणांना त्यांच्या शिस्त, नेतृत्वगुण, तांत्रिक कौशल्य, शारीरिक क्षमता, आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचा अनुभव आणि संघभावना यांचा उपयोग करून पुढील कारकिर्द घडविण्याची संधी मिळणार आहे.

**शासनालाही प्रशिक्षित मनुष्यबळाचा लाभ**

अध्यक्ष एयर मार्शल प्रदीप बापटच्या मते,या निर्णयाचा फायदा केवळ माजी अग्निवीरांनाच होणार नाही, तर महाराष्ट्र शासनालाही अत्यंत प्रशिक्षित,शिस्तबद्ध आणि अनुभवी मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. चार वर्षांच्या लष्करी सेवेतून बाहेर पडणारा अग्निवीर हा शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त,वेळेचे व्यवस्थापन, संघभावना,नेतृत्व,तांत्रिक कौशल्य आणि संकटाच्या प्रसंगी निर्णय घेण्याची क्षमता यांसारख्या अनेक गुणांनी परिपूर्ण असतो.त्यामुळे अशा मनुष्यबळाचा पोलीस, अग्निशमन,वन,कारागृह, राज्य उत्पादन शुल्क,किनारी सुरक्षा आणि अन्य गणवेशधारी सेवांमध्ये उपयोग केल्यास शासनाच्या कार्यक्षमतेलाही त्याचा लाभ होऊ शकतो.

विशेषतः भारतीय नौदलातून सेवा पूर्ण करून बाहेर पडणाऱ्या अग्निवीरांचा किनारी सुरक्षेसाठी उपयोग करण्याबाबतही महाराष्ट्र शासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे.

**माजी सैनिक संघटनांकडून स्वागत**

महाराष्ट्र शासनाच्या या निर्णयाचे राज्यातील अनेक माजी सैनिक संघटना आणि माजी सैनिक समुदायाने मनापासून स्वागत केले असून, या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केल्याबद्दल चे अभिनंदन आणि आभार व्यक्त केले आहेत.

या निर्णयामुळे अग्निवीरांना त्यांच्या लष्करी सेवेच्या ''दुसऱ्या डावात'' सन्मानजनक आणि अर्थपूर्ण रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर,त्यांच्या लष्करी प्रशिक्षणाचा आणि अनुभवाचा उपयोग समाजाच्या सुरक्षिततेसाठी आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेसाठी होणार आहे.

एबीपीएसएसपी तर्फे राज्य शासनाचे आभार❊ एबीपीएसएसपी महाराष्ट्र व गोवा राज्य शाखेने या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री,माजी सैनिक कल्याण मंत्री शंभुराज देसाई, मुख्य सचिव तसेच संबंधित सर्व अधिकारी आणि समितीतील सदस्यांचे आभार मानले आहेत.

एबीपीएसएसपीने जून २०२५ मध्ये मांडलेल्या मागणीपासून आजच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयापर्यंत शासनाने या विषयाचा सातत्याने विचार करून धोरणात्मक निर्णय घेतल्याचे संघटनेने नमूद केले आहे. ''अग्निवीर हा केवळ चार वर्षे सेवा करणारा युवक नसून, राष्ट्रसेवेतून घडलेला प्रशिक्षित आणि शिस्तबद्ध मनुष्यबळाचा स्रोत आहे.त्याला दुसऱ्या डावात योग्य संधी मिळणे ही त्याची गरज असून,त्याच वेळी त्याच्या कौशल्याचा उपयोग शासन आणि समाजासाठी होणे ही देशाचीही गरज आहे. महाराष्ट्र शासनाने घेतलेला हा निर्णय या दोन्ही बाबींची सांगड घालणारा आहे,'' असे एबीपीएसएसपीच्या वतीने एयर व्हाइस मार्शल नितीन वैद्य म्हणाले. एबीपीएसएसपी महाराष्ट्र व गोवा शाखेने भविष्यातही माजी सैनिक,वीर नारी आणि अग्निवीरांच्या कल्याणासाठी शासनाकडे रचनात्मक आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

टीप– वरील मसुद्यात २९ सप्टेंबर २०२६च्या मंत्रिमंडळ निर्णयासंबंधी उपलब्ध ताज्या वृत्तमाहितीचा समावेश केला आहे. शासनाचा सविस्तर निर्णय प्रसिद्ध झाल्यानंतर आरक्षणाची अंमलबजावणी, समाविष्ट पदे, वयोमर्यादा/शारीरिक निकष आणि इतर अटींचे अचूक तपशील त्यानुसार अंतिम प्रसिद्धीपत्रकात अद्ययावत करता येतील.

# पर्यावरणपूरक गणेशमूर्ती घडविणाऱ्या बाल शिल्पकार, सहभागी मुख्याद्यापक, शिक्षक यांचा गौरव सोहळा

**ज्योतिर्मय साहित्य**

बाणेर, पुणे – श्रीभगवती सेवा आश्रम आणि जीवन कौशल्य विकास, बाणेर यांच्या वतीने 'पर्यावरण संवर्धन व संस्कार' या उपक्रमांतर्गत पर्यावरण पुरक ''इको फ्रेंडली'' श्रीगणेशमुर्ती निर्मिती कार्य शाळेत सहभागी झालेल्या बालशिल्पकारांचा गौरव पुरस्कार सोहळा शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३–०० ते सायंकाळी ६–०० कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम ''लोकसेवा इ–स्कूल, पाषाण'', पुणे येथे दुपारी ३.३० ते सायं. ६.०० या वेळेत होणार आहे. कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव, शाडू मातीचा वापर, सर्जनशीलता आणि पर्यावरण संवर्धनाचे संस्कार रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

'पर्यावरण जपुया, संस्कार रुजवू या आणि भविष्य घडवूया' या संदेशातून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात सहभागी झालेल्या बाल शिल्पकारांच्या कलागुणांचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच सहभागी प्राचार्य,मुख्याद्यापक यांना सन्मान चिन्ह व सह शिक्षकांना प्रमाणपत्राने कार्य गौरव करण्यात येईल.

या कार्यक्रमासाठी गिरिधर राठी, डॉ.श्याम कुलकर्णी, दयानंद चिखलकर, विकास जोशी आणि चंद्रकांत जाधव पाटी हे निमंत्रक आहेत. त्यांच्या उपस्थितीत बाल शिल्पकारांचा सन्मान होणार आहे.

पर्यावरण संवर्धना सोबतच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि संस्कारांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम उल्लेखनीय ठरत आहे.

याच गौरव पुरस्कार सोहळ्यात शालेय विद्यार्थ्यांना भवितव्याचा वेध घेणारा स्वयं कौशल्य विकास (स्किल डेव्हलपमेंट) चा कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा संपन्न होणार आहे. प्रामुख्याने महाळुंगे, सुस, बालेवाडी या ठिकाणच्या मनपा शाळेत हा स्किल डेव्हलपमेंटचा कार्यक्रम नियोजित केलेला आहे.

याच कार्यक्रम अध्यक्ष लोकसेवा शिक्षण संस्थेचे श्री. दिपकजी पायगुडे व स्किल डेव्हलपमेंट चे आधारस्तंभ समाजसेवक तथा प्रमुख अतिथी श्री. राजेंद्र तापडिया, अशोक करवा, रवी काबरा व सूशिलजी अग्रवाल हे उपस्थित राहतील.

# योग वर्गाचा वर्धापन दिन

**ज्योतिर्मय साहित्य**



पिंपरी (शिरीषकुमार पाठक) : आज अँथिया सोसायटी, पिंपरी ज्येष्ठ नागरिक संघ यांचा ३ रा योग वर्गाचा वर्धापन दिन मोठ्या जल्लोषात साजरा झाला. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून कर्नल मिलिंद आपटे हे हजर होते.आपल्या भाषणात मिलिंद आपटे म्हणाले, ज्येष्ठ नागरिक यांचा हा सकारात्मक उपक्रम असून त्यांचा आचार, विचार व शारीरिक व बौद्धिक आचराणावर सुपरिणाम तर होतोच पण आयुष्य सुदृढ होते. ह्या उपक्रमास शुभेच्छा देऊन ते पुढे म्हणाले, महिलांनाही यात सामावून घेतले पाहिजे.''

त्याप्रसंगी शिरीषकुमार पाठक यांनी योगावर सुंदर कविता सादर केली. तसेच रावसाहेब मिसाळ, श्रीकांत देव, सदाशिव कल्याणकर, उन्मेश जाधव, प्रसाद वाईकर, शिरीषकुमार पाठक यांनी समयोचित भाषणे केलीत.सौ. हरकरे, उषा जाधव यांनी ही आपली मते मांडली. उपक्रम प्रमुख श्री रमेश पूर्वत यांनी योगाची महती विशद केली. त्यांचे सर्वांनी विशेष अभिनंदन केले.ह्यावेळी पिलखाने, कोंढरे, पूर्वत,पाठक, नारायण जोशी विठ्ठल आवटे वगैरे यांनी जोशात देशभक्तीपर गीते सादर केली.

सदाबहार कार्यक्रम खूपच रंगला.

# तुम्हाला टाळलेल्यांचं हृदय परिवर्तन करा

**ज्योतिर्मय साहित्य**



''अकाउंट क्लोज'' सर्वांना माहीत असलेली बँकिंग टर्म वापरून एक वेगळा विषय आज माणसा – माणसातील नात्यांच्या संदर्भात मांडावा वाटतो.

बँकेतील आपले असलेले खाते बंद करण्यासाठी अर्ज करावा लागतो. असलेली रक्कम विड्रॉल करावी लागते. कर्ज खाते असेल तर देणे देऊन बंद करावे लागते. आणि खाते बंद जरी झाले तरी बँकेला ते तरी रेकॉर्ड ठेवावं लागतं. त्या बँकेच्या समोरून जाताना प्रत्येक वेळी वाटतं माझं इथे खातं होतं.

काही माणसं पण माणसांचं आपल्याकडे असलेलं नातेसंबंधाचे खाते बंद करताना दिसतात. कुणी काही कारणाने तर कोणी काही कारणाने. असेच अकाउंट क्लोज केलेली माणसं समोरून जाताना पण लक्षात येतातच ना..? मोबाईलचे विश्वामध्ये ''मी त्याला ब्लॉक केलं'' हे अभिमानाने मान उंचावून, आवाज वाढवून सांगितलं जातं. जणु काही क्लोजिंग चे डिजिटल सर्टिफिकेट देत आहेत. माझं खातं क्लोज केलेली अनेक माणसं आहेत. परंतु मी परत खातं चालू करायचा प्रयत्न करतो.

पूर्वी खूप मोठ्या प्रतिष्ठा आणि मानहानीच्या प्रकारातच माणसं माणसाशी असलेल्या नात्याचे संबंध तोडायचे. आजकाल काही प्रमाण फार मोठे कारण राहिले नाहीत. किरकोळ गोष्टीवरून ब्लॉक केलं जातं. कारण त्या नात्यांचा आधारही तसाच कुजका कमकुवत असतो.

मला वाटतं संपूर्ण जगाशी सारखं नातं असावं. कोणाशी कमी कोणाशी जास्त प्रेम असू नये. आपलं व्यक्तिमत्वच प्रेमपूर्ण असावं. पान, फुलं, झाड, वेली, नद्या, तळे, विहिरी, पहाड, आभाळ, जमीन, पशुपक्षी, प्राणी सर्वांशी... उरलेल्या सगळ्यांशी आत्मवत् म्हणजे स्वतः सारखं प्रेम करावं, समजावं. जीव असो आजीव असो, निर्माता एकच. मग फरक कसा ?

मी एखाद्या दगडालाही असा स्पर्श करतो जसा की मित्राच्या खांद्यावर हात ठेवत आहे.

मग एखाद्याने माझा सतत अपमान करून गरज संपल्यावर मला टाळून मला बंद केलं तरी मी माझा स्वभाव सोडत नाही. मी त्याला पुन्हा मित्रत्वात प्रेमात आणण्याचा प्रयत्न करतो.




मी हे मला कळतं त्यावेळेस पासून करतो. आमच्या गावात एकच माणूस असा राहिला होता जो माझा द्वेष करत होता. त्याच्यासाठी मी हृदय परिवर्तनाची खूप मोठी तपश्चर्या केली. काही वर्षानंतर ते माझा सन्मान करू लागले.

आजही काही लोक आहेत ज्यांनी मला क्लोज केलंय, मी विचार परिवर्तन आणि हृदय परिवर्तन यामध्ये विश्वास ठेवतो. याप्रकारे झालेला बदल हा कायमस्वरूपी असतो. आणि तो व्यक्ती समाजासाठी ही चांगला असतो.

अशा माणसांना टाकून न देता, टाकाऊ पासून टिकाऊ, जे आवडत नाहीत त्यांना आपल्या सौंदर्याच्या व्याख्यात बसवणे... असे करत... मी एक म्युझियम बनवले आहे. त्यामध्ये अशा सर्व चेहऱ्यांची माणसं आहेत. होय मी त्यांना सुद्धा जपतो ज्यांनी माझा असन्मान केला,अपमान केला, मला कमी समजले. त्या म्युझियम कडे पाहतच मी मला सतत तपासत असतो. माझ्यातील प्रेम कमी तर झाले नाही ना..? याची ही उजळणी हिशोब करत असतो.

म्हणून मी त्यांनाही जपतो आणि माझा स्वभाव ही जपतो. असेच एक म्युझियम आहे माझ्याकडे. त्यांना पाहत मी पुढे जातो. आपलं अकाउंट क्लोज केलं तो इतिहास झाला. इतिहास विसरायचा नसतो तर त्यापासून काहीतरी शिकायचं असतं. या निमित्ताने इतकंच.




भाद्रपद शुक्ला षष्ठी, { दिनांक १७ सप्टेंबर २०२६}

## द्वितीय आत्मधर्म : उत्तम मार्दव धर्म

आत्म स्वभावा मध्ये मान किंवा अभिमानाच्या अभावाने शांती स्वरूप अवस्था उत्पन्न होणे यास उत्तम मार्दव (मृदुता) असे म्हणतात.

_मृदोर्भाव: मार्दवम्_ अर्थात् मृदुभाव उत्पन्न होणे, कठोरतेच्या अभावाने मृदुता उत्पन्न होते. कठोरतेचा अभाव होण्यासाठी विनम्रता,विनय देखील अत्यंत आवश्यक आहे. संसारामध्ये व्यवहार करत असताना मनुष्य अनेक प्रकारचा मान अभिमान किंवा गर्व बाळगतो.

व्यक्ती साधारणपणे आठ प्रकारचा गर्व किंवा मान बाळगतो असे मूळ शास्त्रात विधान आहे. ते म्हणजे जाती, कुल, विद्या, बल, ऐश्वर्य, रुप, तप आणि धन. यांना मनुष्य स्वतःचे स्वरूप जाणून त्या विषयी अत्यंत गर्व करतो. आणि त्यामुळे स्वभावात एक प्रकारची आखड किंवा कठोरता निर्माण होते. यामुळे अनेक प्रकारचा अध्यात्मिक तसेच व्यावहारिक विनाश होतो.

मान अभिमान किंवा गर्व होऊ नये आणि त्यामुळे व्यावहारिक आणि आध्यात्मिक विनाश होऊ नये यासाठी विनय धारण करावा. हेच धर्म तत्त्वज्ञानाचे मूळ आहे. ज्ञान आणि अनेक सदगुणांची प्राप्ती व्हावी,जगात कीर्ती निर्माण व्हावी, कोणीही आपल्याशी वैर करू नये या गोष्टीची आवश्यकता भासत असेल तर गर्व सोडून विनयशील व्हावे.

मृदुता येण्यासाठी गर्व, अहंकार नाहीसा झाला पाहिजे. त्याशिवाय विनम्रता, वचन माधुर्य, पूज्यता, दान, सन्मान यापैकी एकही गुण प्राप्त होणार नाही. गर्विष्ठ व्यक्तीला कारणाशिवाय शत्रू उत्पन्न होतात. त्याची सर्वत्र निंदा होते. सर्वांना त्याची मानखंडना व्हावी असे वाटते.

निरभिमानी व विनयशील व्यक्ती आपली सर्व कार्य गुरुच्या आदेशानेच करत असतात. विनय गुणानेच मृदूतेचा विकास होतो. आणि उत्कृष्ट अशा दशलक्षण आत्म धर्मा पैकी उत्तम मार्दव धर्म याची प्राप्ती होऊन आत्मसमृद्धी उत्पन्न होते.

बलराज संघई, छत्रपती संभाजीनगर 9420015108

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559